# प्रकरण पहिले

## कादंबरी : एक वाङ्मय प्रकार आणि सुमेध वडावाला यांचे कथात्मक लेखन

-: प्रकरण पहिले :-

## कादंबरी : एक वाङ्मय प्रकार आणि सुमेध वडावाला यांचे कथात्मक लेखन

- ❖ कादंबरी एक वाङ्मय प्रकार
- ❖ कादंबरीचे स्वरूप
- ❖ कादंबरीचा उद्देश
- ❖ कादंबरीच्या व्याख्या
- ❖ कादंबरीचे घटक
- ❖ कादंबरीचे वर्गीकरण
- ❖ कादंबरी व इतर वाङ्मय प्रकार
- ❖ सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांचे कथात्मक लेखन
- ❖ कथासंग्रह
- ❖ रिसबूडांचे कादंबरी लेखन
- ❖ समारोप
- ❖ संदर्भग्रंथ

# प्रकरण पहिले

## कादंबरी : एक वाङ्मय प्रकार आणि सुमेध वडावाला यांचे कथात्मक लेखन

### कादंबरी एक वाङ्मय प्रकार :

प्रस्तुत लघुशोध प्रबंधात ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा अभ्यास आपणास करावयाचा आहे. त्यासाठी कादंबरी या वङ्मय प्रकाराचा विचार करणे आवश्यक ठरते. या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करता, त्याचे स्वरूप, उद्देश, घटक, कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे वर्गीकरण, अनेक अभ्यासकांनी सांगितलेल्या व्याख्या आणि कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा इतर वाङ्मयप्रकाराशी तुलनात्मक अभ्यास या ठिकाणी करावयाचा आहे. यापुढील भागात सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा थोडक्यात आढावा घ्यावयाचा आहे. यात त्यांचे एकूण कथासंग्रह आणि कादंबऱ्यांचा समावेश असणार आहे.

### कादंबरीचे स्वरूप :

निसर्गत : मानवी जीवनात कथा या वाङ्मय प्रकारची आवड असल्यानें अगदी प्राचीन काळीसुध्दा कथा हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय होता. या कथा पिढयां-पिढया जनमानसाद्वारे एका पिढीने जतन करून पुढील पिढीस देत जिवंत ठेवल्या आणि त्या जनमानसात टिकून राहिल्या. आधुनिक कालखंडाचा प्रारंभाच्या काळात कादंबरी या वाङ्मय प्रकारास पोषक असेच गद्य लेखन झाले असे दिसून येते. पाश्चात्य कादंबरीच्या पार्श्वभूमीवर आपल्याकडेही कादंबरी लेखनाला चालना मिळाली. १७ व्या शतकातील ' सरव्हॉन्टीस ' आणि ' रॅबेलेने 'या कादंबरीकारांचे सुरुवातीचे लेखन हे या वाङ्मय प्रकाराला पोषक असेच झालेले आहे.

साहित्य म्हणजे कथा, कादंबऱ्या या केवळ मनोरंजनासाठी लिहिल्या जातात, असा अनुभव मराठी वाङ्मयात रूढ झाला होता. पण आता कादंबरी या वाङ्मय प्रकाराकडे एक यशस्वी असा वाङ्मय प्रकार म्हणून बघितले जाते. कादंबरी हा वाङ्मय प्रकार करमणुकीबरोबरच ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानप्रसाराचे एक उत्तम साधन मानले जाते. यामुळे या वाङ्मय प्रकाराकडे दुर्लक्ष

करून चालत नाही. शि.म.परांजपे यांनी कादंबरीच्या बाबतीत असे म्हटले की, " साहित्यसेवक हा जीवनाचा भाष्यकार असतो. ही भूमिका त्याने खरी करून दाखवावयाची म्हटल्यास कादंबरी इतके दुसरे सुलभ साधन प्राप्त होणे कठीण "[१]

बऱ्याच अभ्यासकांच्या मते कादंबरी हा वाङ्मय प्रकार मानवी जीवनाचा आरसा आहे. परंतु मानवी जीवन एवढे विस्तारीत व गुंतागुंतीचे आहे की, कादंबरीतून मानवी जीवनाचे संपूर्ण जीवन चित्रित करणे अशक्य असते. कारण कोणत्याही साहित्यकृतीतून केवळ मानवी जीवनातील एखाद्या लहान-मोठया घटकाचेच दर्शन घडवू शकतो. फरक एवढाच की, एखादा लेखक इतर व्यक्तिमत्त्वांपेक्षा निरनिराळया अनुभवांचा एका विशिष्ट दृष्टीकोनातून विचार करून इतरांहून भिन्न अनुभव साहित्याद्वारे मांडत असतो. यासर्व गोष्टींना त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्वही कारणीभूत ठरत असते. यामुळे कादंबरी हा एक महत्त्वाचा वाङ्मय प्रकार मानला जातो. साधारणपणे कादंबरी म्हणजे काय ? असा प्रश्न आपणांस नेहमीच पडत असतो. पण या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. त्याचे निश्चित उत्तर देणे अशक्य असले तरी, समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केलेला आहे. कारण वाङ्मयीन व्यवहारांच्या आकलनासाठी निश्चित अशी दिशा मिळण्यास असे प्रश्न निर्माण होणे गरजेचे असते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार मानला जातो. त्यावेळी त्याच्याअंगी असलेल्या वैशिष्टयांचा उपयोग होतो. त्या सर्व वैशिष्टयांवर नेमकेपणाने बोट ठेवावे लागते.

कादंबरीकार हा आपल्या कल्पनाशक्तीने कादंबरीतून एक सत्य सृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्त्न करतो. हा प्रयत्त्न आभासात्मक स्वरूपाचा असतो. म्हणजे कांदबरीतून मानवी जीवनाचे रूप प्रतिबिंबित करण्यात येते. लेखक हा कादंबरी लेखनाला मानवी जीवनाचा आधार घेत असतो. ती कादंबरी स्वतः निर्माण होत नसून तिची निर्मिती करावी लागते. तिच्यात विशिष्ट घटक द्रव्यांचा अवलंब करावा लागतो. या द्रव्यांना ज्या वेळेस एका विशिष्ट आकारात उतरवले जाते, त्या आकारातून त्यांना विशिष्ट अर्थ प्राप्त होतो आणि त्यातून साहित्यकृती जन्मास येते. कादंबरीकाराचे जीवन अनेक अनुभव विश्वाने व्यापलेले असते. तो अनुभव कादंबरीतून उतरवीत असतो. त्यांना आपल्या लिखाणात स्थान देतो. त्याचे कला जीवन आणि वास्तवातील जीवन यात

फरक असतो. त्याच्या वेगवेगळया जाणिवा असतात. याबद्दल उषा हस्तक असे म्हणतात," जीवन आणि कला या संदर्भात त्यांचा दृष्टीकोन ज्या स्वरूपाचा असेल त्यानुसार तो कादंबरी रचनेच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरणाऱ्या अनुभवांवर आपले लक्ष केंद्रीत करतो "[२]

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे मूळ प्राचीन आहे. त्याचे कारण कथा या वैशिष्टयपूर्ण होत्या. त्यात अद्भुताचे,आकर्षणाचे आणि आदर्शाचे चित्रण केलेले असायचे. या कथा संपूर्ण जगभरात पसरल्या आहेत. त्यामुळे कुसुमावती देशपांडे यांनी याबाबतीत असे म्हटले की, " भारतीय लोककथा एका लोकसमूहापासून दुसऱ्या लोकसमूहाकडे इतक्या लवकर भटकत गेल्या की, आपणाला युरोप आणि आशिया खंडातील बहुतेक सर्व प्रदेशातून, इतकेच नव्हे तर आफ्रिकन लोकातही त्या अंशरूपाने दिसतात "[३] (पृ.१५) ( महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग - १० वा क्र.२६७ ) म्हणून एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे. १९२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या ' महाराष्ट्र भाषेचा कोश ' या ग्रंथात कादंबरी या शब्दाचा तसा अर्थ दिला आहे. कादंबरी हा शब्द विशिष्ट अशा साहित्य प्रकारालाच वापरला जातो. संस्कृत कवी बाणभट्ट यांच्या ' कादंबरी ' या नायिकेच्या नावावरून ' कादंबरी ' हा शब्द रूढ झाला आहे.

तर पाश्चात्य वाङ्मयात महाकाव्य, नाटके, काव्य इ. प्रकारांपेक्षा निराळा म्हणजेच ' नवे ' रूप धारण केल्याने ' नॉव्हेल ' असा शब्द इंग्रजीत रूढ झाला आहे.

कादंबरी ही समाजात निर्माण होत असल्याने तिची प्रेरणा समाजात असते. काळानुसार तिच्या प्रेरणेत व रूपात बदल होत जातो आणि वेगवेगळया विषयांवरच्या कादंबऱ्या उदयास येतात. अगदी सुरुवातीच्या काळातील मराठी कादंबऱ्यांमध्ये अशा प्रकारचे लेखन आढळते. उदा. बाबा पद्मनजी यांची ' यमुनापर्यटन ' (१८५७) या कादंबरीविषयी भालचंद्र नेमाडे म्हणतात, " पुररुज्जीवनाच्या काळात हिंदुस्थानात व मराठीत पहिल्यांदाच अशी कृतिप्रधान कादंबरी निर्माण व्हावी हा केवळ योगायोग आहे की, आधुनिक होऊ पाहणाऱ्या मराठी समाजाची ही सर्वात प्रबळ इच्छा असेल. हा चर्चेचा विषय आहे "[४] कारण या काळातील कादंबऱ्या केवळ मनोरंजनासाठी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

निर्माण झालेल्या आहेत. उदा. मुक्तामाला (१८६१), मोचनगड (१९७१) या कादंबऱ्यांमध्ये केवळ वास्तवाचा आभास निर्माण केलेला दिसतो. परंतु नंतरच्या काळातील मराठी कादंबरी ही वास्तवतेच्या अधिक जवळ गेलेली दिसते.

या कालखंडातील कादंबरीत वास्तवता दिसते. मात्र १९५० नंतरचा कालखंड हा मराठी कादंबरीच्या दृष्टीने अतिशय अनुकूल असा आहे. कारण या कालखंडातील लेखनामागे सामाजिक प्रेरणा आहे. थोडयाफार प्रमाणात याही काळात अद्‌भुत, रोमॅन्टिकता दिसते. याचे कारण कोणत्याही काळात कोणत्याही प्रकारची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. एवढेच नव्हे, तर एकाच लेखकाच्या लिखाणात व एकाच साहित्यकृतीत अनेक प्रवृत्ती सापडू शकतात; म्हणून नेमाडे म्हणतात," जगभराच्या निष्ठावंत साहित्यिकांनी आयुष्यभर तडीस नेलेली तंत्रे सर्व मिळून मराठीतल्या एकाच कादंबरीकारात आयती सापडू शकतात. "[५] ' नवकादंबरी ' हा देखील १९६० नंतरच्या कादंबरी वाङ्मयातील एक प्रवृत्तीचा भाग समजला जातो.

त्यामुळे कादंबरीची काटेकोरपणे व्याख्या करणे, तिचे वर्गीकरण, वर्णन करणे कठीण असते. कारण मानवी जीवनातील विविध पैलू म्हणजे मानवाची अनुभवसृष्टी, रचनाविश्व आणि त्यांचा परिसर यातील हरतऱ्हेची विविधता कादंबरीतून व्यक्त होत असते. त्यामुळे कादंबरीच्या व्याख्येत, रचनेत एकवाक्यता नसल्याने तिचे तंत्रही निश्चित करता येत नाही. तरीदेखील कादंबरी या वाङ्मयप्रकाराने सर्व सामान्य स्वरूप धारण केल्यामुळे हळूहळू तिचा विकास होतो आहे. आणि ती वास्तवतेच्या अधिक जवळ जात असल्याचे दिसते. तिच्यात मानवी जीवनातील सामान्य व्यवहारात वापरल्या जाणा-या भाषेचा उपयोग पत्रे, आठवणी, रोजनिशी, आत्मनिवेदने यासारख्या व्यक्तिगत मनोगतातून तिची संहिता विकसित होऊ लागली.

या वाङ्मयप्रकाराकडे १९२० पर्यंतच्या कालखंडापर्यंत विशेष लक्ष दिले गेले नव्हते. त्यानंतर मात्र का.बा.मराठे, वि.का.राजवाडे,हरीभाऊ आपटे यांनी कादंबरीकडे लक्ष वेधले.त्यांनी वाचक वर्गात कादंबरीविषयी आवड निर्माण केली. हा कादंबरी वाङ्मय प्रकार म्हणजे एक सेंद्रिय एकात्मता असलेला वाङ्मयप्रकार आहे असे मत चंद्रकांत बांदिवडेकर यांनी व्यक्त केले. "

कादंबरीच्या कथाबीजाची प्रवृत्ती एकदा निश्चित झाल्यानंतर सेंद्रिय एकात्मतेच्या तत्त्वानुसार त्याचा विकास होत जातो. "[६] यासर्व गोष्टींना जर एक चांगला आकार दयावयाचा असेल तर त्या लेखकाजवळ प्रतिभा, स्फूर्ती आणि व्यापक सहानुभूती याचा अंश असावा लागतो. त्यातून तो मानवी जीवनाचे बाह्य व अंतरिक जीवनाचे दर्शन घडवू शकतो.

**कादंबरीचा उद्देश** :-

कादंबरीत घडणा-या घटना या सहजगत्या अथवा निसर्गतः घडत नसून त्या घटनांची निर्मिती करावी लागते. म्हणूनच कादंबरी या वाङ्मय प्रकाराची निर्मिती ही सहेतूक असते. हा कादंबरी या वाङ्मयप्रकारामागचा उद्देश समजला जातो. साहित्यिकाला भावलेल्या जीवनविषयीच्या सत्याच्या विशिष्ट रूपाची एक निश्चित कल्पित कथा निर्माण करतो. एक अर्थपूर्ण रचना शब्दांच्या आधारे रूप धारण करुन कादंबरीचा जन्म होतो. कादंबरीच्या मूल्यमापनासाठी आणि विश्लेषणासाठी जे निकष उपलब्ध होतात. त्यात फरक असतो. कथामूल्य व जीवनमूल्य या दोन्ही मूल्यांच्याआधारे लेखन केले जाते. केवळ रुपात्मक दृष्टीकोनातून कोणत्याही कादंबरीचे लेखन केले जात नाही. केवळ रूपात्मक कादंबऱ्या समाजात विशिष्ट जागृती करण्यास उपयुक्त नसतात. म्हणून लेखक हे जीवनमूल्यांवर अधिक निष्ठा ठेवून त्याचा अविष्कार करतात. याबाबतीत उषा हस्तक यांनी आपल्या ग्रंथात असे म्हटले - " वास्तव जीवनातील समस्या कादंबरीच्या जगात प्रतिबिंबित झाल्यास त्यातील व्यक्ती कोणत्या जीवनमूल्यांचा अवलंब करून त्या समस्यांना सामो-या जातात ह्यांचाच ते बारकाईने शोध घेतात "[७]

जर लेखकांच्या प्रेरणांचा अभ्यास केला अथवा त्या प्रेरणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तर कादंबरीचे आकलन होण्यास वाचकाला मदत होते. त्यासाठी त्या निर्मात्याचे व्यक्तित्व आणि तो जगत असलेले सामाजिक जीवन, सांस्कृतिक घटक आणि नैसर्गिक, घटकांचा फार मोठया प्रमाणावर प्रभाव आपणास जाणवतो. उदा. कादंबरीच्या लेखनामागील जाणिवा जर सामाजिक असतील तर लेखकाचा दृष्टिकोन देखील सानाजिक असतो असे आपण म्हणू शकतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**कादंबरीच्या व्याख्या** :-

कादंबरी हा वाङ्मयप्रकार निरनिराळया लोकांनी हातळल्यामुळे तिचे भिन्न-भिन्न रूप तयार झाले आहे. म्हणून तिच्यातील विषयांच्या व तंत्राच्या विविधतेमुळे व्याख्या करणे अशक्य आहे. कादंबरी या ग्रंथास पूर्णपणे लागू पडेल अशी एकही व्याख्या आजवर उपलब्ध नाही. तिने एका बाजूला करमणूक व विनोदाचे ध्येय समोर ठेवून वाटचाल केलेली दिसते. तर दुसरीकडे ती मानवी जीवनातील दु:खी, कष्टी, नैराश्यमय संसाराचे वर्णन करून गांभीर्य व उदासीनता यांच्या वातावरणात मिसळून जाते. म्हणून कादंबरीची व्याख्या करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. कादंबरी हा वाङ्मय प्रकार विस्तिर्ण व गुंतागुंतीचा आहे. कारण लेखक या साहित्यकृतीद्वारे समाजातील विविध अंगांचे दर्शन घडवीत असतो. म्हणून कादंबरीची एकच एक व्याख्या सांगता येत नाही. तरी ब-याच अभ्यासकांनी ' कादंबरी ' ची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे. बापट, गोडबोले यांच्या ग्रंथात पाश्चात्य विचारवतांची व्याख्या आहे ती अशी, फिल्डिंग - ' गंभीर वातावरण नसलेले गदय महाकाव्य '[८] तसेच मनोविश्लेषणास प्राधान्य देणारे टीकाकार कादंबरीची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगतात -" हृदयांतरंगाचे आविष्करण अथवा मानवी हृदयाचा सूक्ष्म कलात्मक अभ्यास म्हणजे कादंबरी होय. "[९]

पाश्चात्य समीक्षक एच.जी. वेल्सने कादंबरीची व्याख्या विनोदी स्वरूपात दिलेली आहे. तो म्हणतो " ज्यात सर्व काही सामाविल अशी गारुड्याची थैली " म्हणजे कादंबरीमधील विविध विषयांच्या आधारावर ही व्याख्या अवलंबून दिसते.

पाश्चात्य अभ्यासकांसारखाच मराठीतील कादंबरीच्या अभ्यासकांनी देखील कादंबरीच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला. भालचंद्र नेमाड्यांनी ' टीकास्वयंवर ' या ग्रंथात दिलेली व्याख्या महत्त्वाची आहे, ते म्हणतात, " कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंगे अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत अशी साहित्यकृती असते "[१०]

या व्याख्यांमुळे कादंबरीची संहिता उभी राहते. तसेच मराठी वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशात कादंबरीची व्याख्या दिली आहे ती अशी, " कादंबरी म्हणजे कथनात्म लिखित गदयाचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल. असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय "[११] कॅथरीन लीव्हर

तर मराठी विश्वकोशातील तिस-या खंडात कादंबरी या घटकात रा.ग.जाधव यांनी जी व्याख्या दिली आहे ती अशी, "कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोण व त्यांना अनुरूप निवेदन तंत्र, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गदयात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय "[१२]

म्हणजेच वाङ्मयीन संज्ञा स्पष्ट करणाऱ्या इंग्रजी कोशातील ' नॉव्हेल 'या संज्ञेच्या ज्या व्याख्या दिलेल्या आहेत त्या पडताळून पाहिल्यास ' कादंबरी ' या वाङ्मय प्रकाराची अटी पूर्ण करू शकणारी व्याख्या आढळत नाही. तर तिच्या गुणधर्माच्या आधारावर अनेक व्याख्या आढळतात. उषा हस्तक यांनी मात्र कादंबरीची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

गुणधर्म -

I) " कादंबरी हे कथात्म गदयाचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. तिला किमान लांबी तरी हवीच. त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची किमान आणि कमाल मर्यादा सूचित करण्यासाठी शब्दसंख्येचा आधार घेण्यात आलेला आहे.

II) या वाङ्मय प्रकारात कथानकाला किंवा निवेदनाला महत्त्व असते.

III) कादंबरीने व्यापलेल्या विषयांची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

IV) लघुकथा आणि लघुकादंबरी हयांच्यापेक्षा तिला मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरूपात घडविता येते. कारण तिचा फलक त्याच्याकहून अधिक विस्तृत असतो.

V) घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय व्यामिश्र रूपांचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी सामान्यतः स्थूल कलाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो."[१३]

कांदबरीच्या या वैशिष्टयांतून कादंबरीच्या विविध अंगाचे दर्शन होते. तसेच का.बा. मराठे यांनी देखील नावल आणि नाटक या निबंधात कादंबरीची व्याख्या दिली आहे, " ज्यात आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असता अव्वल पासून अखेरपर्यंत वाचणाऱ्यास नवल वाटावे असा ग्रंथ म्हणजे नावल " [१४]

बाणभटट्च्या याच नावाच्या गदय आणि कल्पित कथात्मक ग्रंथावरून हे नाव आले आहे. श्री.मा. कुलकर्णी यांनी इंग्रजी कोशातील एक व्याख्या दिली आहे ती अशी, " A fictitious prose tale or narrative of considerable length in which characters and actions professing to represent those of real life are portrayedin a plot"[१५]

तसेच या इंग्रजी व्याख्येच्या बरोबरच श्री. मा. कुलकर्णी यांनीदेखील कादंबरी या वाङ्मय प्रकाराची व्याख्या दिलेली आहे. ती देखील या ठिकाणी विचारात घेणे उपयुक्त ठरेल, " कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गदय कथा म्हणजे कादंबरी होय."[१६]

या सर्व कादंबरीच्या व्याख्येचा सविस्तर विचार करता आपल्याला असे जाणवते की, कादंबरी या वाङ्मय प्रकारावर एकही व्याख्या उपलब्ध नाही याचे कारण या वाङ्मय प्रकाराची वाढत चाललेली विशाल अशी मांडणी होय. तिच्या सीमा आता निश्चित करता येणे कठीण होत आहे. म्हणून एक निश्चित नसली तरी या सर्व व्याख्येवरच समाधान मानावे लागते.

**कादंबरीचे घटक :-**

कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर प्रवास करणारा असा प्रवाही साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीकार हा पात्रांच्या इच्छा, आकांशा, क्रिया, प्रतिक्रिया यांचे दर्शन घडवून ते खरेखुरे वाटावेत

यासाठी प्रयत्न करीत असतो. पात्रांना जिवंतपणा प्राप्त करून देण्यासाठी विशिष्ट स्थलकाल उभारत असतो. व या क्रिया - प्रतिक्रियातून अनेक घटना निर्माण होतात. या घटना लक्षात घेतल्या म्हणजे तिचे घटकही लक्षात येतात. कारण स्थल काल यांचीच कथानकाला पार्श्वभूमी असते. या वाङ्मयप्रकाराचा तांत्रिक दृष्टीने विचार केल्यास कथानक, स्वभावलेखन, मनोविश्लेषण, वातावरण निर्मिती, पात्र, भाषा व शैली आणि संवाद इ. घटकांचा समावेश होतो. या घटकाच्या अभ्यासामुळे रसग्रहण आणि मुल्यमापन करण्यास मदत होते. परंतु काही अभ्यासकांनी कादंबरीच्या घटकांना महत्व दिले नाही. त्यांच्या मते - कादंबरी ही सेंद्रिय एकात्मतेचा भाग असल्याने तिचा केवळ आशयानुसार विचार केला जावा असे स्पष्ट केले. तरीसुध्दा काही अभ्यासकांना हे मत मान्य नसल्याने तिच्या घटकांचा विचार या ठिकाणी करणे उपयुक्त ठरेल.

- I) **कथानक :**

' वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशा ' त कथानकाची व्याख्या दिली आहे. ती अशी- " कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालाच्या अवकाशात घडत आहेत. कादंबरीतील पात्रे काय करीत आहे. त्यांचे विचार काय आहेत. हे कादंबरीकार सांगत असतो, या साऱ्यांची जुळणी करणाऱ्या एकात्म, घटट् विणीलाच ' कथानक ' असे म्हणतात "[१७] कार्यकारण सूत्र कथानकाची जुळणी करण्याचे कौशल्य हे त्या कादंबरीकाराच्या कलात्म उद्देशाशी निगडित असते. कथानक आणि गोष्ट यातला फरक स्पष्ट करताना ई.एम.फॉस्टर यांनी गोष्ट ( स्टोरी ) आणि कथानक ( प्लॉट ) यांची दोन उदारहणे दिली आहेत. १. ' राजा मेला आणि त्यानंतर राणी मरण पावली ' ही गोष्ट, तर २. ' राजा मेला आणि त्यानंतर त्या दु:खाने राणी मरण पावली. ' हे कथानक.

कथानक हे कोणत्या प्रकारचे असू शकते याबद्दल पाश्चात्य अभ्यासक एलिस आर कामिन्सी यांनी काही समीक्षकांच्या मताचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढला आहे. माणसाचा जन्म, त्याचे मर्त्यत्व, त्याच्या क्षुधा, त्याची सुखदु:खे, मानवाची हिंसावृत्ती, त्याने निर्मिलेले कायदे, कुटुंब, व्यवसाय इत्यादी. तसेच तो ज्या वातावरणात राहतो त्या वातावरणातील सर्व घटकांचा समावेश कथानकात केला जाऊ शकतो. कादंबरीच्या मजकूरात घटना, प्रसंग, पात्रे इ. समावेश होतो. विविध विषयांना पचवून जीवनाशी संबंधित अशी आशय सूत्रे पकडून कादंबरीने सामाजिक,

ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक, सज्ञांप्रवाहात्मक, विज्ञानविषयक असे अवतार धारण केले आहेत. या सर्वांचा संबंध कथानकाशी येतो.

कथानकात घटनांच्या गुंफणीला व त्यातील कार्यकारण संबंधाला अधिक महत्त्व असते. कादंबरीत प्रत्यक्ष सत्य असावयाची आवश्यकता नसते. कादंबरीतील सत्याचे स्वरूप अधिक व्यापक असल्याने त्यात संभवनीय सत्यालाही स्थान असते. या सत्य घटना जर संगतवार रचलेल्या असल्या, तर कथानक हे अधिक उठावदार दिसते. त्यासाठी लेखकाने लेखन कौशल्याचा वापर योग्य पद्धतीने केला पाहिजे. कारण कथानक वाचकांना चटकदार, गोडी वाटण्यास,वाचावेसे वाटावे यासाठी प्रयत्न करा.

कथानकाला कादंबरीचा मध्यभाग मानले जाते. कारण कादंबरीला आपल्या आकर्षक स्वरूपात प्रकट होण्यासाठी कथाबिजाची आवश्यकता असते. त्याशिवाय ती प्रकट होऊ शकत नाही. कथानक हे एका क्रमवारीत दिले म्हणजे त्याला कथानकाचा दर्जा मिळत नाही. त्यासाठी त्यात प्रसंगांचे कालानुक्रमाने कार्यकारण भावाचा दुवा स्पष्ट करावा लागतो. म्हणजेच कथा वस्तूत शक्यतेपेक्षा संभाव्यतेला महत्त्व असते. कथानक हा कथात्मक वाङ्मयाचा आत्मा मानला जातो. यासंबंधी बापट, गोडबोलेंच्या ग्रंथात पुढील वाक्य महत्त्वाचे आहे. " संभाव्यता, कार्यकारण मीमांसा, व कुतूहल निर्मिती हे गुण कथानकाविषयी आवश्यक मानले आहेत. "[१८] कादंबरीत कथानकाला महत्त्व असते. त्याप्रमाणे उपकथानकेही कादंबरीत विस्तारलेली असतात. उपकथानकांचे महत्त्व साधर्म्य किंवा विरोध दाखवून मुख्य कथानकातील रहस्य खुलवणे हे आहे. त्यामुळे कथानकाप्रमाणेच उपकथानकालाही महत्त्व असते.

II) **व्यक्तिचित्रण** :

कादंबरीकाराला कुठलीही कादंबरी लिहावयाची असेल तर, आधी कथानकातील पात्रांची निर्मिती करावी लागते. त्याशिवाय कादंबरी लेखन होत नाही. इतिहासकार घटनेचे वर्णन करण्यासाठी पुराव्यांचा आधार घेतो. मात्र कादंबरीकाराला कथानक साकारतांना पुराव्याची आवश्यक भासत नाही. तर तो आपल्या प्रतिभाशक्तीने ऐतिहासिक पुराव्यांशिवाय व्यक्तिचित्रण

साकारू शकतो. त्यामुळे पात्रांची सुखस्वप्ने, त्यांचे ध्येय, आकांक्षा, सुखदु:खे इ. सर्व व्यक्त करणे हा त्या कादंबरीकाराच्या कल्पना शक्तीचा भाग आहे. म्हणून कादंबरीकार हा पात्रांचा जनक असतो. जशी वातावरणाची परिस्थिती बदलते, तशीच पात्रांचीही स्थिती बदलत जाते. म्हणून त्यांचा विकास होतो.

घटनांना नुसता कालक्रमच नसतो तर त्यांना काही अर्थही असतो. काही मूल्ये असतात. त्यामुळे या घटनांच्या मागचे हेतू स्पष्ट होऊन अर्थ निश्चित होतो. पण त्यांना जी मूल्ये प्राप्त होतात ती संबंधित व्यक्तिमुळेच. मनुष्याला शरीराबरोबर मनही असते. या मनाला कादंबरीत स्थान आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या बाह्य मनाबरोबरच अंतर्मनाचाही शोध घेण्याचा प्रयत्न कादंबरीकार करत असतो. म्हणून श्री.मा.कुलकर्णी म्हणतात की, " मनुष्याच्या बाहयांगामध्ये आकृती, वर्ण, वेशभूषा, चालण्याच्या व बोलण्याच्या लकबी, भाषा आणि काही बाहय सवयी इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. तर अंतरंगात मनाची संवेदनशीलता, राग-विराग, आशा-आकांक्षा, श्रध्दा, विश्वास, दया, करुणा, आदी भाव, भावना, विचार, विकार इ. अनेक गोष्टींचा समावेश होतो. "[१९]

काही कादंब-यांमध्ये कथानकाला महत्त्व असते. तर काही कादंबऱ्या पूर्णपणे पात्राभोवती लपेटलेल्या असतात. उदा. अण्णाभाऊ साठे - ' फकिरा ', श्री.ना.पेंडसे - ' गारंबीचा बापू ' या कादंब-या पात्रांभोवती लपेटलेल्या दिसतात. इ.एम.फॉर्स्टर यांनी पात्रांचे दोन प्रकार कल्पिले आहेत. १) विकासी पात्रे आणि २) स्थिर पात्रे. त्यापैकी स्थिर पात्रे वाचकांच्या लवकर लक्षात येतात. तर विकासी पात्रे परिस्थितीनुसार बदलत असल्यामुळे लवकर लक्षात येत नाहीत. ही पात्रे वाचकांच्या लवकर लक्षात यावीत यासाठी पात्रांच्या बारीकसारीक हालचाली देखील वर्णन कादंबरीकार करतो. त्यामुळे कादंबरीत एकाच वेळी पात्रांचे वेगवेगळे प्रकार व त्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चित्रण वाचकास पहावयास मिळते. त्यामुळे कादंबरीच्या कथानकालाही गती येते. कादंबरीत किती पात्रे असावीत याला ठराविक नियम नाही. फक्त ती नैसर्गिक व मानसिक दृष्टया समृध्द असावीत. ती मुख्य आणि गौण अशा स्वरूपात येतात.

III) <u>वातावरण निर्मिती</u> :

" कादंबरीतील पात्रे कोठेतरी वावरत असतात, त्यांच्या भोवती एक विविध वस्तूंनी भरलेले जग असते. त्यालाच आपण वातावरण ' ॲटमॉसफिअर ' किंवा ' सेटींग ' म्हणतो. "[२०] अशी व्याख्या वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशात देण्यात आली आहे. यावरून आपल्या असे लक्षात येते की, वातावरण निर्मिती ही स्थल काल, भौगोलिक परिसर, सांस्कृतिक जडण-घडण, घरे किंवा रस्ते, यांच्या आधारे केली जाते. या वातावरणनिर्मितीचा उद्देश कादंबरीतील भौगोलिक वा सामाजिक, सांस्कृतिकतेची कल्पना देणे असा असतो. याची उत्तम उदाहरणे म्हणजे - ' बनगरवाडी ' (व्यंकटेश माडगूळकर ), ' गारंबीचा बापू ' ( श्री.ना.पेंडसे), ' सराई ' ( र.वा.दिघे ) व ' पडघवली ' ( गो.नि.दांडेकर ) इ. होय. म्हणजे या कादंबरीतील माणसे जितकी महत्त्वाची तेवढीच वातावरणनिर्मिती महत्त्वाची आहे.

तसेच कादंबरीतील घटना, प्रसंग, व्यक्ती यांच्या द्वारे जे कथानक निर्माण होते त्या कथानकाला वास्तवता, अस्सलपणा प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. त्यामुळे काल्पनिक स्थल काल निर्मितीदेखील वास्तव वाटते. सूचकतेमुळे साहित्याला कलात्मकता प्राप्त होते. हा साहित्याचा आवश्यक गुण मानला जातो. वातावरणनिर्मितीच्या द्वारा ही सूचकता निर्माण होत असते. वातावरणनिर्मितीकडे दुर्लक्ष करून चालत नाही. कारण कथानकाची संगती लावतांना त्याचा उपयोग होतो. याबाबतीत फडके यांनी असे म्हटले आहे की, " ऐतिहासिक नाटकात व कादंबरीतही कित्येकदा ज्या काळाचे व स्थळाचे वर्णन लेखक करीत असतो त्याचे त्याला विस्मरण होऊन अनवधानाने आजकालच्या गोष्टींचा किंवा समजूतींचा निर्देश जुन्या काळाचे वर्णन करतांना त्याच्याकडून केला जातो. "[२१]

या घटकांचा तांत्रिकदृष्टया विचार करताना त्याची स्थलविषयक किंवा भौगोलिक विषयक वातावरणाची आधी दखल घ्यावी लागते. म्हणजेच कादंबरीतील प्राकृतिक वर्णनालाही महत्त्व द्यावे लागते. मराठी साहित्यात असा विचार सुरुवातीपासूनच केल्याचे दिसते. उदा. ' पिराजी पाटील ' ही कादंबरी होय. या कादंबरीत अतिशय सुंदर वातावरण निर्मिती केली आहे. तसेच पुढील काळात

देखील वि.स.खांडेकर आणि ना.सी.फडके यांनी आपल्या कादंबरी लेखनातून वातावरणनिर्मितीला महत्त्व प्रदान केले. त्यामुळेच प्रादेशिक कादंबरी हा वाङ्मय प्रकार उदयास आला.

IV) **निवेदन पध्दती** :

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीला कथानक असते. आणि हे कथानक लेखक ज्या पध्दतीने सांगतो ती पध्दत म्हणजे निवेदन होय. प्रस्तुतीकरण ही निवेदनाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. निवेदन हे प्रथम पुरुषी म्हणजे (मी, आम्ही ) तर कधी तृतीय पुरूषी म्हणजे ( ती, तिने / ते, त्या, ती ) अशा पध्दतीने केले जाते. निवेदनात पात्रापात्रात संभाषण असते. तर कधी एकाच्या पात्राच्या मनातील स्वभाषण असते. निवेदन करणारा निवेदक हा लेखक असतो. त्याने निवेदनाची विविध माध्यमे निर्माण केली आहेत. प्रथम पुरुषी, तृतीय पुरुषी निवेदक हे पात्राने निवेदन करतो. तसेच पत्रे, दैनंदिनीच्या द्वारा कथानकाचे निवेदन करणे इ. विविध पध्दतीने निवेदनपध्दती विकसित झाली आहे.

कादंबरीचे कथानक, पात्रचित्रण, वातावरण निर्मिती, भाषा इ. घटाकांचा समावेश तांत्रिक मानला जातो. पण ' निवेदन ' हा घटक कादंबरीचा आधारभूत असा घटक आहे. निवेदन म्हणजे कथन करणे. त्यामुळे लेखकाला कादंबरीतून घडलेल्या घटनांचे, पात्रांचे त्याच्या कृतीचे, स्वभावाचे जे चित्रण येते. ते निवेदनातूनच. निवेदक लेखक असला तरी कधीकधी तो त्या कादंबरीतील पात्रांच्या तोंडून निवेदन करत असतो. उदा. हरिभाऊनीं आपल्या ' पण लक्षात कोण घेतो ? ' या आणि वा.म.जोशी यांच्या 'इंदू काळे, सरला भोळे ' या कादंबऱ्यांचे घेऊ शकतो.

निवेदनाच्या वरील दोन पध्दती - प्रथमपुरुषी व तृतीय पुरुषी या निवेदनपध्दतीपेक्षा आणखी काही पध्दती पाश्चात्य अभ्यासक पर्सी लबक याने सांगितल्या आहेत. त्या म्हणजे ' पॅनरॅमिक ' आणि ' सिनीक ' या होय. या सर्व निवेदनपध्दतीला लय असते. एक गती असते. ती सांभाळण्यावरच कादंबरीच्या निवेदनाचे यश अवलंबून असते.

V) **भाषा आणि शैली** :-

मराठी भाषा प्राचीन काळापासून व्यवहारात वापरली जाते. म्हणून मराठी भाषेत वाङ्मय निर्मितीदेखील भरपूर प्रमाणात झाली आहे. या वाङ्मय प्रकारावर संस्कृत भाषेचा आणि आंग्लकालीन इंग्रजी भाषेचा प्रभाव आढळतो. भाषा ही वास्तव जीवनाचे आकलन होण्यास मदत करते. म्हणून ती वास्तववादी व नैसर्गिक असावी लागते. १९५० नंतरच्या कादंबरी वाङ्मयात बोलीचा वापर ही याचीच ग्वाही देते. त्यामुळे कादंबरीचे कथानक, पात्रचित्रण, वातावरण निर्मिती याप्रमाणेच ' भाषा ' निर्मिती हा कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कारण कादंबरीची परिणामकारकता ही त्या कादंबरीच्या भाषा आणि शैलीवर अवलंबून असते.

लेखक निवेदनासाठी वेगळी तर संवादासाठी वेगळी भाषा वापरीत असतो. ती वास्तववादी असावी यासाठी त्याचा प्रयत्न असतो. तसेच कादंबरी ही कोणत्या प्रकारची आहे. यावरही तिच्यातील भाषाशैली अवलंबून असते. उदा. जर कादंबरी ऐतिहासिक असेल, तर पात्रांच्या तोंडी वा विशेष ऐतिहासिक तपशीलाचे वर्णन करताना इतिहासकालीन शब्द वापरावे लागतात. किंवा जर कादंबरी ग्रामीण असेल तर, संवादासाठी ग्रामीण बोली वापरली जाते. कादंबरीकार कादंबरीत ज्याप्रकारे विश्व साकारतो. त्या विश्वाला अनुरूप अशी भाषा वापरतो. भाषा ही एक सामाजिक संस्था मानली जाते. आणि त्यामुळे भाषेद्वारा मानवाच्या बाहय व्यवहाराबरोबरच आंतरिक व्यवहारही पार पाडले जातात. तसेच भाषा ही जाती - जमातीनुसार, भौगोलिक प्रदेशानुसार व काळानुसार बदलते. कादंबरीतील या भाषेचा चांगला उपयोग हा समीक्षकांना होतो. कारण तिचे आकलन, आस्वाद घेण्यासाठी भाषा ही उपयुक्त ठरते. म्हणून निरनिराळया अनुभवांना, प्रसंगांना अनुरूप भाषा वापरून कादंबरीकार कादंबरीत जिवंतपणा आणून सत्याभास निर्माण करीत असतो.

कादंबरीकार भाषेद्वारे आपले विचार व्यक्त करीत असल्याने त्याचे विकार, भाव - भावना व्यक्त करण्यासाठी भाषेचाच वापर होतो. म्हणजेच भावनात्मक व कल्पनात्मक सौंदर्याचा आविष्कार करीत असतो. हा आविष्कार म्हणजेच शैली असे म्हटले जाते. शैलीला वैयक्तिक बाजू असली तरी तिला पात्र व प्रसंगानुरूप वळण दयावे लागते. तरच तिच्या सुंदरतेचे दर्शन घडते.

म्हणजेच कादंबरीतील भाषाशैली त्या - त्या प्रसंगाला अनुरूप असून त्या - त्या पात्राला अनुकूल व साजेशी असावी लागते. त्यामुळे सुरूवातीच्या काळातील भाषेपेक्षा स्वातंत्र्योत्तर काळातील भाषा ही अधिक कृत्रिम वाटत नाही. म्हणजेच ती सहजतेकडे, अलंकारिकतेकडून साधेपणाकडे अत्युक्तीकडून यथार्थतेकडे व वास्तविकतेकडे वळलेली आहे. या बाबतीत श्री. मा. कुलकर्णी यांनी असे म्हटले की, " भाषाशैली म्हणजे लेखकाच्या अंतःकरणातील विचार विकारांना व भाव - भावनांना तसेच त्याच्या बौध्दिक व भावनात्मक अनुभवांना वगैरे मिळालेले विशिष्ट असे शब्द रुप होय " [२२] यावरुन शैलीचे महत्त्व स्पष्ट होते .

ही शैली लेखक राहात असलेल्या देशकालपरिस्थितीच्या प्रभावाने साकारली जाते. त्यामुळे साहित्यकृतीच्या लेखन शैलीवरून आपण त्या साहित्यिकाचे व्यक्तित्व जाणू शकतो.

संवाद :-

संवाद हा कादंबरीचा एक अत्यंत मनोरंजक घटक समजला जातो. त्यामुळे कादंबरीत नाटय निर्माण होते. हे नाटय वाचकाच्या चटकन लक्षात येत असल्याने तो वाचक कादंबरीकडे आकृष्ट होत असतो. हे सामर्थ्य संवादात आहे. त्यामुळे या संवादातून अनेक घटना कळतात. पात्रांच्या मनातील विचार, विकार, भाव - भावना इ. समजण्यासाठी कादंबरीतील संवाद हे एक उकृष्ट साधन मानले जाते. संवाद हा कथानकाशी आणि एका व्यक्तिदर्शनाशी संबधित असतो. याद्वारे व्यक्तिदर्शन अत्यंत प्रभावीपणे करता येऊ शकते. पात्र आणि प्रसंगांना अनुरूप असे संवाद जर कादंबरीतून वापरले गेले, तर त्या कादंबरीचे मोल अधिक वाढते. मात्र हे संवाद प्रत्यक्षातील संवादासारखे तंतोतंत असून चालत नाही. तसेच ते कृत्रिम आणि पुस्तकीही असू नयेत. संवादाची भाषा बोजड आणि अलंकारिकही नसावी. म्हणजेच ते संवाद नैसर्गिक व स्वाभाविक वाटले पाहिजेत. यासाठी लेखकाने अत्यंत स्वाभाविक संवादाचा पुरस्कार करावा. संवादात त्याच त्या शब्दाचा वापर करण्याचे टाळावे. उदा. प्रत्येकवेळेस ' तो म्हणाला ' असे एकच पालूपद लावू नये. त्यामुळे संवाद कंटाळवाणे वाटतात. म्हणून कादंबरीकाराने संवादाचे प्रमाण अत्यंत कमी व मार्मिकपणे वापरावे.



BARR. B. KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कादंबरीच्या वरील घटकांचा आपण सविस्तर विचार केला. त्यात सामान्यतः कादंबरीचे घटक हे कादंबरीविषयी कोण - कोणत्या पध्दतीचे वैशिष्टये स्पष्ट करतात याचा विचार केला. कादंबरीतील सर्वच घटक कादंबरीविषयी भरपूर माहिती स्पष्ट करतात. कादंबरीतील सर्वच घटकांच्या व्यतिरिक्त आणखीनही काही घटक कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे सांगता येतात. यावरून असे म्हणता येते की, कादंबरीचे घटकही कादंबरीच्या वाङ्मयीन तंत्रात महत्त्वाची मानली जातात.

**कादंबरीचे वर्गीकरण** :-

कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या स्वरुपाचा आणि घटकांचा विचार केल्यानंतर आपणास या ठिकाणी कादंबरीच्या वर्गीकरणाचा अभ्यास करावयाचा आहे. कादंबरी या वाङ्मयप्रकारात आजपर्यंत अनेक विषयांना स्थान मिळाल्याने तिची अनेक रूपे तयार झाली आहेत. या रुपांचा टप्प्याटप्प्याने विचार केल्यास तिचे वर्गीकरण होत असते. तसेच कादंबरीकार हा त्याच्या वास्तव जीवनात अनेक विषयांना आणि अनुभवांना सामोरे जात असतो. या अनुभवांना शब्दबध्द करतो. त्यामुळे वाङ्मयनिर्मिती होते. त्यातूनच कादंबरी या वाङ्मय प्रकाराचाजन्म झालेला दिसतो. या कादंबरीच्या विविध गुणांच्या आधारे तिचे वर्गीकरण केले जात असते.

I) **सामाजिक कादंबरी** :-

वाङ्मयातून समाजाचे चित्रण करणे हे सामाजिक कादंबरीचे मुख्य उद्दिष्ट असते. याद्वारे समाजाचे प्रबोधन होत असते. जीवनवादी भूमिकेतून लेखन करणाऱ्या लेखकांचे लेखन हे सामाजिक असते. अशाप्रकारच्या लेखकाला कलात्मकतेची आणि रंजकतेची जाणीव ठेवावी लागते. कारण केवळ समाजाचे वर्णन कलाकृतीतून केले तर ती कलाकृती वाङ्मयीन कलाकृती वाटणार नाही. म्हणून साहित्याच्या निर्मितीच्या बाबतीत कलात्मकता हा गुण अत्यंत आवश्यक मानला जातो.

सामाजिक कादंबरी ही वास्तववादी कादंबरी असते. पण सर्वच वास्तववादी कादंब-या सामाजीक असतातच असे नाही. म्हणून सामाजिक कादंबरीचे वैशिष्टय स्पष्ट करताना

श्री.मा.कुलकर्णी म्हणतात " विशिष्ट समाजाचे चित्र रेखाटणे, समाजस्थितीचे दर्शन घडविणे, सामाजीक प्रश्नाचे उद्‌घाटन करणे यापैकी एका अगर अधिक हेतूने प्रेरित होऊन कादंबरी लिहिली असेल वा तो हेतू सिध्दीस गेला असेल तर अशा कादंबरीला सामाजिक कादंबरी म्हणणे योग्य होईल."[२३] याचा विचार करता मराठी वाङ्मयातील हरीभाऊंच्या सर्व कादंब-या सामाजिक ठरतील. या कादंब-यांची पार्श्वभूमी ही समाजातील चालीरीती, आचार-विचार व घडामोडीचे चित्र उभे करण्याचीच आहेत. त्यामुळे या कादंबऱ्यातून मानवी जीवनाचा पट उभा राहात असतो.

II) **<u>ऐतिहासिक कादंबरी</u>** :

ऐतिहासिक कादंबरी कोणती हे सामान्य वाचकही सहज सांगू शकतो. कारण ऐतिहासिक कादंब-यांचे विषय इतिहासकालीन असतात. पण इतिहासच असतो असे नाही. इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यात फरक असतो. तो म्हणजे इतिहासात प्रत्यक्ष घटनात्मक सत्यावर भर असतो. तर कादंबरीत संभवनीय सत्यही चालते. तसेच इतिहास हा कृतिप्रधान व घटनाप्रधान असतो. म्हणून सत्य हेच एकमेव आधार असते. मात्र ऐतिहासिक कादंबरीत लेखकाला कल्पनेला भरपूर वाव असतो.

मराठीतील ' मोचनगड ' (१८६०) ही पहिली ऐतिहासिक कादंबरी मानली जाते. ( रा.भी.गुंजीकर ) ही कादंबरी ' विविध ज्ञान विस्तार ' या नियतकालिकातून क्रमशः प्रसिध्द केली गेली. नंतरच्या काळात हरिभाऊ आपटे, नारायण हरी आपटे, चिं.वि.वैद्य, नाथमाधव यांनी देखील ऐतिहासिक कादंबरीचे लेखन केले आहे. या कादंबरीतील प्रत्येक व्यक्ती, एखादे विशिष्ट स्थळ, काळ व परिस्थितीशी बांधलेली असतात. इतिहासात घडलेल्या गोष्टींची कालक्रमानुसार नोंद असते. मात्र ऐतिहासिक कादंबरीत इतिहासातील व्यक्ती व घटना प्रसंग आहेत. तशाच येतील असे होत नाही.

ऐतिहासिक कादंबरी कोणत्या उद्देशाने लिहिली जाते, त्यानुसार त्या कादंबरीचे स्वरूप ठरते. म्हणून ऐतिहासिक कादंबरीत जो काळ उभा केला जातो, त्या काळाला अनुरूप अशी भाषा व त्या

व्यक्तींची स्वभाव वैशिष्टये निर्माण करावी लागतात. इतिहासाची आणि ऐतिहासिक कादंबरीचे उद्दिष्टये वेगवेगळी असू शकतात. इतिहासकार हा भूतकाळातील घटनांकडे पाहतांना वस्तुनिष्ठ स्वरूपात पाहतो. तर ऐतिहासिक कादंबरीकार हा त्या घटनेला काल्पनिकतेचा मुलामा देऊन त्याच्या मूळ रूपालाच कोणत्याही प्रकारची बाधा येऊ न देता आकर्षक कादंबरीची निर्मिती करतो. मात्र हे करण्यासाठी त्या कादंबरीकारास काल्पनिकतेची व प्रतिभाशक्तीची जोड असावी लागते.

III) **मनोविश्लेषणात्मक कादंबरी** :

साधारणपणे मराठीत मनोविश्लेषणात्मक कादंबरीची सुरुवात १९२५ च्या सुमारास झाल्याचे मानले जाते. सुरुवातीच्या काळातील लेखकांमध्ये पु.ल.देशपांडे यांच्या ' सुकलेली फुले ' व ' काळी राणी ' तसेच विभावरी शिरूरकर यांच्या ' हिंदोळयावर ', ना.सि.फडके यांची ' उध्दार ' यांचा समावेश होतो. कादंबरीतून पात्रांच्या मनातील विचारांबरोबरच त्यांच्या विचारांवर, भावनांवर आणि अंतर्मनात चालणाऱ्या आंदोलनावर प्रकाश टाकलेला असतो. मानवी मनाचे सूक्ष्म अतिसूक्ष्म घडामोडींचे चित्रण या कादंबऱ्यातून येते. म्हणून या कादंबऱ्यामधील कथानकाला महत्त्व न येता त्यामधील पात्रांच्या मनाला महत्त्व प्राप्त होते. म्हणजेच कादंबरीकार हा पात्रांच्या अंतर्मनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करतो.

त्यामुळे मानवी मनांच्या विविध पैलूंचे दर्शन लेखक कादंबऱ्यातून करीत असतो. मानवी मनातील विविध भावनांचा संघर्ष साहित्यिक लेखनातून दाखवतो. पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ डॉ.सिमन फ्राईड यांच्या मनोविश्लेषणात्मक विचारांतून प्रेरणा घेऊन अथवा त्याचा अभ्यास करून अनेक लेखकांनी कादंबरी लेखनातून मानवी मनाच्या अंतरंगाचे दर्शन घडविले. या सर्व लेखनात ' मानवी मन ' हे केंद्रस्थानी मानले जाते.

IV) **वास्तववादी कादंबरी** :

वाचकाच्या अभिरुचीचा विकास झाला म्हणजे वाचकाला अवास्तव साहित्य वाचण्यास आवडत नाही. अशा वेळी वाचक हा वास्तवतेकडे वळतो. त्यामुळे वास्तववादी साहित्याचा जन्म झाला आणि त्यातूनच वास्तववादी कादंबरीचे रूप साकार झाले. वास्तववादी कादंबरीत

कथानकाच्या काळाची निश्चित कल्पना केलेली असते. म्हणून या काळातील सर्व खुणा दाखविल्या जातात व त्याकाळाला शोभेल असेच विचार, घटना, अशीच भाषा, अशाच सर्व घटनांचा समावेश होतो. या कादंबरीत काल विपर्यास होणार नाही, याची खबरदारी घेतली जाते.

वास्तववादी कादंबरीत स्थळाच्या बाबतीत निश्चित अशी दिशा ठरलेली असते. पूर्वीच्या काळातील कादंबऱ्यांपेक्षा वास्तववादी कादंबरीत नायक - नायिका अत्यंत सामान्य दिसतात. म्हणजे या कादंबऱ्यात सामान्य माणूस नायक होऊ लागला आणि सामान्य स्त्री ही नायिका होऊ लागली. त्यामुळे वास्तववादी लेखक हा त्याच्या लेखनातून, सत्य किती दुखःमय असले, तरी ते आपल्या साहित्यातून मांडत असतो आणि समाजातील विविध घटकांचे दर्शन घडवित असतो. या कादब-यांमुळे समाजप्रबोधन होण्यास खूप मोठया प्रमाणावर हातभार लागतो.

V) **<u>अद्‌भुतरम्य कादंबरी</u>** :-

कोणत्याही भाषेतील आरंभीचे वाङ्मय बहुधा अद्‌भुतरम्य असेच आहे. याचे कारण वाचकाचे मन वाचनाकडे वळावे आणि वाचनाची आवड निर्माण व्हावी. सुरुवातीचा वाचक अद्‌भुत गोष्टीत रमत असल्याने सुरुवातीचे सर्वच वाङ्मय अद्‌भुतरम्य आहे. असंभाव्यता व तर्कशून्यता ही अद्‌भुतरम्य कादंबरीची वैशिष्टये मानली जातात. म्हणून स्वैर कल्पना विलासाकडे या कादंबरीचा अधिक रोख असतो. त्यामुळे ही कादंबरी केवळ मनोरंजन करते असा अरोप केला जातो.

कादंबरीचे कथानक असंभाव्य, चमत्कृतिपूर्ण पण सुरस व रम्य अशा घटना, ठोकळेबाज, प्रतिकात्मक निर्जीव अशा व्यक्ती, वाटेल अशा प्रकारचे स्थळ आणि काळ इ. प्रकारच्या सामग्रीतून ही कादंबरी उदयास आली. जग हे कसे आहे हे वास्तववादी कादंबरीकार सांगतो तर ते कसे असावे याबाबतीत अद्‌भुतरम्य कादंबरीकार सांगतो. त्यासाठी लेखक हा कल्पनाशक्तीचा वापर अत्यंत कुशलतेने करतो. पण या कादंबरीतून कोणत्याही प्रकारचा सामाजिक दृष्टिकोन साकार होत नाही .

VI) **पौराणिक कादंबरी** :-

ऐतिहासिक व्यक्तींच्या जीवनावर प्रकाश टाकत जशी ऐतिहासिक कादंबरी निर्माण झाली. त्याच तत्त्वावर आधारित पौराणिक कादंबरीची निर्मिती झालेली आहे. पुराणातील व्यक्ती, घटना आणि त्या व्यक्तींच्या जीवनावर प्रकाश टाकणारी ही कादंबरी मराठी वाङ्मयात स्वतःची ओळख निर्माण करणारी आहे. या कादंबरीत पुराणातील व्यक्ती व स्थळ सोडता ती पूर्णतः काल्पनिक असते.' ययाती ' नंतर ( १९५९ ) या कादंबरी प्रकाराला विशेष बहर आला. पुराणांमागचा उद्देश पाप - पुण्य, धर्म - अधर्म, समाजाचे नियमन करुन व समाजाचे दर्शन घडवून समाजात आदर्श निर्माण करण्याचा असतो. त्यामुळे उदात्तता, भव्यता व काव्यात्मता ही पौराणिक वैशिष्टये कादंबरीतून येणे अत्यंत आवश्यक असते. पौराणिक कादंबरी ज्या काळातील असेल त्या कालखंडातील वातावरण निर्मिती, भाषा, पोशाख, परिसर, शिष्टाचार यांचा सूक्ष्म विचार करणे आवश्यक असते.

या कादंब-यांच्या लेखनामागे विशिष्ट हेतू असल्याने या कादंबऱ्यातून जे विविध विषय आलेत त्यात सामान्यतः महाभारत, रामायण, पुराणकथा, जातककथा, पंचतंत्रकथा इ. आहेत. खरे तर अशा प्रकारचे कादंबरीलेखन करणा-या लेखकांच्या दृष्टीने भारतीय पौराणिक कथांच्या उपलब्धतेमुळे त्यांना भरपूर वाव आहे. परंतु जर आपण पौराणिक कथा वाङ्मयाचा विचार केला, तर ' नाटक  या वाङ्मयप्रकारात पौराणिक विषयांचा जेवढया प्रमाणावर उपयोग केला. तेवढया प्रमाणात कादंबरी या वाङ्मय प्रकारात केला गेला नाही. या कादंबऱ्या आजच्या जीवनातील परिस्थिती व समस्यांना उत्तरे देण्यास उपयोगी पडतात. कारण यांमधील विविध विषय अत्यंत प्रभावी असतात. उदा. ' अहिल्योध्दार ' ( १९९९ ) ना.के. बेहरे हे या कादंबरी लेखनातून वाकडे पाऊल पडणाऱ्या स्त्रियांबद्दल माणुसकी युक्त कळकळ बाळगावी व त्यांचा उध्दार करावा असे सांगण्याचा प्रयत्न करतात.

VII) **राजकीय कादंबरी** :-

राजकीय कादंबरीच्या बाबतीत फ्रेंच कादंबरीकार 'स्तांधाल ' असे म्हणतो की, " एखादया वाङ्मयीन कृतीत येणारे राजकारण म्हणजे जणू एखादया संगीताच्या मधुर मैफिलीत उडालेल्या पिस्तुलाच्या बारासारखी कर्कश आणि अभिरुची हीन गोष्ट आहे. परंतु तरीही ती एकदम आपले लक्ष वेधून घेते ही गोष्ट नाकारता येणार नाही."[२४] लेखक या कादंबरीत कल्पनाशक्तीने राजकीय कल्पनांचा किंवा राजकीय वातावरणाचा वापर अधिक प्रबळतेने करतो. वातावरण ठळकपणे आणि स्पष्टपणे मांडण्याचा कादंबरीकाराचा प्रयत्न असावा लागतो. त्यामुळे राजकीय ताण - तणाव, मानवी वर्तणूक - भावना यांचे चित्रण येते. तसेच पात्रांच्या गतविधीत आधुनिक विचारसरणीचा वापर केलेला असतो. तसेच या कादंबऱ्यातून मूर्त - अमूर्त यांचा संघर्ष दाखवलेला असतो. यामुळे राजकीय वातावरण निर्माण होण्यास मदत होते. हे सर्व यशस्वी होण्यासाठी लेखकाचा अनुभव अस्सल असला पाहिजे. कारण फक्त राजकीय हालचाली, डावपेच, तत्वविचारांचे आचरण व उल्लंघन याच गोष्टीवर अवलंबून राहता कामा नये.

१९६० नंतर मराठी कादंबरी वाङ्मयात अशा कादंबऱ्या लेखनाला चालना मिळाली. त्यात सामान्यतः पुढील कादंब-यांचा राजकीय कादंबरी म्हणून विचार करु शकतो. रानभूल - ए.वि.जोशी, आग - पु.भा. भावे, झाकोळ - मनोहर शहाणे, सिंहासन - अरुण साधू, डोंबाऱ्याचा खेळ - भाऊ पाध्ये इ. कादंबऱ्या विशेष उल्लेखनीय आहेत.

VIII) **ग्रामीण कादंबरी** :-

१९२० - १९४७ या काळातील अधिकांश लेखन शहरात आलेल्या स्थिरावलेल्या नागरी लोकांनी ( लेखकांनी ) केले आहे. त्यामुळे या साहित्यातून ग्रामीणतेचा प्रत्यय फारच क्षीणपणे येतो. खेडयातील जळते वास्तव हे कुठल्याही कादंबरीतून प्रत्ययास येत नाही. तत्कालीन लेखकांची खेडयाकडे पाहण्याची वृत्ती रोमँटिक होती. परंतु महात्मा गांधींच्या राजकीय नेतृत्वाच्या उदयानंतर सर्वदेशभर अनेक क्षेत्रात स्पंदने निर्माण झाली. ' खेडयाकडे चला ' ' भारताचा आत्मा खेडयात आहे '. अशा घोषणांच्या प्रभावामुळे राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात एक प्रकारची विशिष्ट अशी जागृती निर्माण होऊन लेखक ग्रामीणतेवर लिखाण करु लागले. यात अण्णाभाऊ साठे, उध्दव

शेळके, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, व्यंकटेश माडगूळकर इ. साहित्यिकांनी मोलाची भर घातली.

ग्रामीण कादंबऱ्यातून जीवनाचे वास्तवचित्रण येऊ लागले. ते खेडयातील जनजीवनाशी एकरूप होऊ लागले. त्यांचे चित्रण करु लागले. ग्रामीण कादंबरी विशालरुप धारण करु लागली. आणि तिची लोकप्रियताही वाढली. परंतु ग्रामीण कथा या वाङ्मय प्रकाराने ठामपणे आपला ठसा मराठी वाङ्मयीन क्षेत्रात उमटविला त्या प्रकारे ग्रामीण कादंबरीला अजूनही स्वतःचे स्थान निर्माण करता आले नाही असे समीक्षकांचे मत आहे.

IX) **प्रादेशिक कादंबरी** :-

प्रादेशिक कादंबरी विषयी कादंबरीचे अभ्यासक बालशंकर देशपांडे यांनी प्रा.फडके यांचे मत ग्रंथात दिले आहे. " ज्या प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीचे कथानक घडत असते. त्या प्रदेशाच्या निसर्गसौंदर्याविषयी वाचकाला आकर्षण वाटेल अशी सुंदर वर्णने कादंबरीत करायला हवीत. तिच्यातले निसर्गचित्रण प्रभावी असायला हवं."[२५] प्रादेशिक कादंबरीतून एका विशिष्ट भूप्रदेशाचे वर्णन त्यातून आले पाहिजे.त्यासाठी केवळ तिच्यात त्या प्रदेशातील बोलीचा वापर करून भागत नाही. तर तिथल्या राजकारणाचा, सांस्कृतिक वातावरणाचा समावेश असावा. त्यासाठी त्या कादंबरीकाराने तेथील समाजाचा, सांस्कृतिक वातावरणाचा, भौगोलिक परिस्थितीचा आणि राजकीय वर्तुळाचा अभ्यास करणे गरजेचे असते.

प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण जीवनाचे, वास्तवतेचे चित्रण करते. जेव्हा एखादया प्रदेशाचे वर्णन या कादंबरीमधून येते , तेव्हा तेथील निसर्ग व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. ' बनगरवाडी ,गारंबीचा बापू, धग, भावीण ' या प्रादेशिक कादंबऱ्यातून ते जाणवते. प्रादेशिक आणि ग्रामीण यात नेहमी गोंधळ होतो. मात्र या दोन्ही वेगवेगळया कादंबऱ्या आहेत. त्यात फरक असतो. प्रादेशिक कादंबरीत परिसर, निसर्ग, तेथील लोक संस्कृती यावर भर दिलेली असते. तर ग्रामीण कादंबरीत एखादया गावातील समस्या ग्रामीण जीवनातील लयबध्द पध्दती आणि ती एकाच कुटुंबाचे दर्शन घडवू शकते. उदा. गोतावळा ( आनंद यादव ) पाचोळा ( रा.रं. बोराडे ) या

कादंब-या व्यक्तिचित्रणातून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवितात. म्हणून ग्रामीण कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरीने मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकलेली आहे.

X) **संज्ञाप्रवाही कादंबरी** :-

' संज्ञाप्रवाही ' हा अभिव्यक्तीचा एक मराठी साहित्यातला नवा प्रकार आहे. तो मराठी साहित्यात काही साहित्यिकांनी कादंबरी लेखनातून रूढ करण्याचा प्रयत्न केला. परंतु या प्रयत्नाला पाहिजे तेवढया प्रमाणात यश लाभले नाही. मराठी कादंबरी वाङ्मयात मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, वसंत कानेटकर, भालचंद्र नेमाडे, किरण नगरकर इ. लेखकांनी हा प्रकार रुजवण्याचा प्रयत्न केला. हा कादंबरी प्रकार फ्राईडच्या मनोविश्लेषण शास्त्रावर अवलंबून आहे असे मानले जाते. संज्ञाप्रवाही या प्रकारची व्याख्यादेखील देण्याचा प्रयत्न काहीनी केला आहे ती अशी, " भाषापूर्व पातळीवरच्या स्मृती, भावना आणि विचार एखाद्या प्रवाहाप्रमाणे आवेगाने परस्परामध्ये मिसळून आलेल्या अशा जेथे शब्दबध्द केलेल्या असतात, त्या कादंबरीला संज्ञाप्रवाहात्मक कादंबरी म्हणता येईल. "[२६] ' रात्रीचा दिवस ', ' घर ', ' कोसला ', ' सात सक्कं त्रेचाळीस ', ' काळसूर्य ' आणि ' अजगर ' इ. कादंबऱ्या संज्ञाप्रवाहात्मक निवेदनातून आल्या आहेत. या कादंबऱ्यांमधील पात्रांवर नेहमीच्या व्यवहारातील कालकल्पनेचे बंधन असत नाही. त्यांचे स्थळ आणि काळ ही वेगळयाच जाणिवेतून वेगळयाच पातळीवर असते. म्हणजेच आंतरीक विश्वातील अत्यंत रहस्यमय असे विश्व या कादंबऱ्यातून साकारलेले असते.

अशा प्रकारे कादंबरीच्या वर्गीकरणाचा विचार आपण या ठिकाणी केला. अजूनही कादंबरीचे तिच्यातील विषयांनुसार वर्गीकरण करता येऊ शकते. त्यांच्या केवळ नावांचा विचार करणे या ठिकाणी योग्य ठरेल. म्हणून कादंबरी हा वाङ्मय प्रकार किती विस्तारीत चालला आहे त्याचा अंदाज आपण घेऊ शकतो. हेतूप्रधान कादंबरी, रहस्यप्रधान कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, दलित कादंबरी, मनोविज्ञानात्मक कादंबरी, चरित्रप्रधान कादंबरी, विनोदी कादंबरी, गांधीवादी कादंबरी, मार्क्सवादी कादंबरी इ. याचेकारण कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या कक्षा वाढत जात असल्यामुळे तिच्यातील विविध विषयांवरून तिचे वर्गीकरण केले जाते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**कादंबरी व इतर वाङ्मय प्रकार** :-

कादंबरी हा वाङ्मयप्रकार आज सर्वात लोकप्रिय असा वाङ्मय प्रकार आहे. याचे एकमेव कारण म्हणजे त्याच्यातील वैशिष्टयामुळेच होय. मराठी कादंबरीचा इतिहास फार मोठा नाही. जशी काव्य, नाटय यांना प्राचीन परंपरा आहे, त्याप्रमाणे कादंबरीस प्राचीन परंपरा नाही. परंतु या वाङ्मय प्रकाराने नाटक, कथा, चरित्र, आत्मचरित्र, निबंध व पत्र इत्यादी सर्व वाङ्मय प्रकारांचे गुण वैशिष्टये पचविल्यामुळे व तिने विशाल स्वरूपात धारण केल्याने बरेच लेखक या वाङ्मय प्रकाराकडे झुकलेले आहेत. म्हणजेच या वाङ्मय प्रकाराने सर्वच वाङ्मयप्रकारांना स्पर्श केला आहे. त्यामुळे आपणांस याठिकाणी कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा नाटक, कथा आणि काव्य एवढया वाङ्मयप्रकाराशी तुलनात्मक व वर्णनात्मक विचार करावयाचा आहे.

I] **कादंबरी व नाटक** :-

कादंबरीकार आणि नाटककार यांच्या मानसिकतेत मूलतः फरक असतो. नाटक आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारात जेवढे साम्य आहे तेवढयाच प्रमाणात विरोधही आहे. व्यक्तिदर्शन व कथानक यात साम्य वाटत असले तरी नाटयप्रयोगाचा आनंद हा एकाचवेळी शेकडो प्रेक्षकांना घेता येतो. मात्र कादंबरीचा आनंद हा व्यक्तिनिष्ठ असतो. नाटकाला रंगभूमीची आवश्यकता असते. त्याशिवाय त्यांचे सादरीकरण होऊ शकत नाही. कादंबरी वाचकाला जेव्हा जेव्हा वेळ मिळतो, तेव्हा तेव्हा तो उपभोगू शकतो व हा आनंद त्याच्या आवडी - निवडीवर अवलंबून असतो. कादंबरीच्या लिखाणातून जर त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले, तर त्याचा फारसा साहित्यकृतीवर परिणाम होत नाही. परंतु जर नाटककाराचे व्यक्तिमत्त्व उमटले तर ते प्रेक्षकांच्या चटकन लक्षात येऊ शकते.

नाटक या वाङ्मयप्रकाराला सादरीकरणाला पुढील गोष्टी आवश्यक असतात. त्या म्हणजे नाटयगृह, नट आणि प्रेक्षक याशिवाय नाटकाचे सादरीकरण शक्य नाही. या उलट कादंबरीचे असते कारण, तिच्या सादरीकरणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणून हा वाङ्मय प्रकार स्वतंत्र

मानला जातो. नाटकाचे यश कलाकार व प्रेक्षक यांच्यावर अवलंबून असून, कादंबरीचे यश त्या कादंबरीकाराच्या लेखनकौशल्यावर अवलंबून असते. कादंबरीत पात्रांबरोबर सुसंवाद साधता येतो. तसा नाटकातील पात्रांबरोबर सुसंवाद साधता येत नाही.

नाटकात जे काही दृश्यरूपाने दाखविले जाते ते सर्व कादंबरीत कथानकाच्या द्वारे शब्दरूपांतून उभे केले जाते. त्यामुळे नाटककार हा स्वतःला प्रगट करू शकत नाही. त्या सर्व पात्रांच्या संवादातूनच सांगावे लागते. कादंबरीकार मात्र वेळोवेळी स्वतः प्रगट होऊन पात्रांविषयी अथवा सभोवतालच्या वातावरणाविषयी कादंबरीतून वाचकांबरोबर संवाद साधत असतो. म्हणून नाटकांपेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय आहे.

II) **कादंबरी व लुघकथा** :-

कथा, कादंबरी यांचा विचार करतांना फक्त तिच्या विस्ताराचाच विचार करतो. पण कथा व कादंबरी यांच्यातील फरक हा केवळ विस्ताराएवढाच मर्यादित नसून, त्यांच्या प्रत्येक घटकांशी निगडीत आहे. हे कथा व कादंबऱ्यांच्या अभ्यासावरून लक्षात येते. कारण प्रत्येकाची विषय मांडणी, निवेदनपध्दती, व्यक्तिरेखा, स्वभाव चित्रण या सर्वच बाबतीत भिन्नता आढळते.

कथा हा वाङ्मयप्रकार फार प्राचीन असून, त्याची लोकप्रियता भरपूर आहे. कथेतून वाचकाला आनंदाबरोबरच बोध या दोन्हींची पूर्तता होते. आणि कथा वाचनास वेळही अगदी कमीच लागतो. याच्या उलट कादंबरीचे आहे. कादंबरी वाचनास वेळ जास्त लागतो. धावत्या जगात एवढा वेळ नसल्याने कादंबरीचे वाचक कमी असतात. तरी तिची लोकप्रियता अफाट आहे. तिच्यातून वाचकांचे मनोरंजन तर होतेच, शिवाय समाजातील वेगवेगळया विषयांमुळे समाज जागृती व समाज प्रबोधनास मदत होते. या गोष्टींची पूर्तता कथेतून केली जाऊ शकत नाही. कारण कुठलीही कथा ही मानवी जीवनाचे व्यापक दर्शन घडवू शकत नाही. तसे तिच्यातून विविध प्रकारच्या छटा दाखविल्या जाऊ शकत नाही.

लघुकथा ही कधीकधी नाटकाला तर कधीकधी कादंबरीला जवळची वाटते. पण तिच्यातील विषयाच्या मर्यादेमुळे वाचकाच्या मनावर कुठलाही एकच संस्कार बिंबवू शकते.

तिच्यात एक - दोनच पेचप्रसंग असतात. तिला एक - दोनच वळणं मिळालेली असतात. पण कादंबरी ही अनेक पेचप्रसंगातून व वळणातून आपले कथानक साकारत असते. म्हणून तिचा पट विशाल असतो.

III) **कादंबरी व कविता** :-

काव्य फक्त कवितेतच असते असे नाही तर ते कादंबरीत ही असते. तिच्या पानापानातून काव्य भरलेले दिसते. कारण कादंबरीचा नायक एखादया वेळी हळवा, संवेदनशील किंवा कवीवृत्तीचा होतो. तेव्हा कादंबरी आपोआपच काव्यमय वाटते. म्हणून कादंबरी ही कविता प्रकाराशी साम्यता दाखविते. तशी विविधता ही तिच्यातून उमटते. जसे काव्य हे पद्यात्मक असते, तर कादंबरी ही गद्यात्मक असते. गद्य आणि पद्य ही दोन्ही या वाङ्मय प्रकाराची माध्यमे आहेत. प्राचीन काळातील रामायण, महाभारत सारखी विशाल जीवनाचे दर्शन घडविणारी महाकाव्ये देखील कथानकाच्या स्वरूपातच आपल्याला रंगविलेली दिसतात. काव्य वाचनाने जसा वाचक भावनाविवश होतो. तसा तो कादंबरी वाचल्याने ही होत असतो.

उदा. - हरीभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यातून वाईट रूढीमुळे स्त्रियांवर होणा-या अन्यायाबद्दल वाचकाच्या मनात असंतोष निर्माण होतो. काव्यात रचनेला महत्त्व असते, तर कादंबरीत विश्लेषणाला महत्त्व असते. काव्य हे रसात्मक, माधुर्ययुक्त, लय व नादबध्द आणि गेय असते. त्याप्रमाणे कादंबरी नसते. नाटक, कथा आणि कविता या सर्व वाङ्मयप्रकारापेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार लिखाणास व वाचकाला समजण्यास अत्यंत सोपा आहे. याविषयी आनंद यादव म्हणतात, " आधुनिक साहित्य प्रकारात कविता, ललितगदय, कथा, नाटक इ. प्रकारातून ही आत्माविष्कार करता येत असला, तरी त्यांच्यावर प्राकारिक बंधने बरीच येतात.कवितेत आत्मनिष्ठेला आणि मानवी वृत्तीतील काव्यात्मकतेलाच प्राधान्य असते. कवितेची भाषा नाही म्हटले तरी व्यवहारातील भाषेपेक्षा वेगळी पडते. ललित गदयात गदय भाषेला स्थान असले, तरी त्यातही आत्मनिष्ठेला प्राधान्य नसेल, तर तो प्रकार कथेकडे, निवेदन प्रकृतीकडे झुकतो. कथेत कोणताही अनुभव व्यक्त करता येत असला, तरी त्याला तिच्या लांबीची, कालपट किती ध्यासाचा

याची अंगभूत मर्यादा असते. नाटक हा प्रकारही सादरीकरणामुळे बंदिस्त झाला आहे. संवादापलिकडे जाऊन तिथे भाषेचा मुक्तपणे वापर करता येत नाही. कादंबरी हया साहित्यप्रकाराच्या बाबतीत अशी बंधने येत नाहीत."[२७] म्हणून कादंबरी लोकप्रिय ठरते.

## <u>सुमेध वडावाला( रिसबूड ) यांचे कथात्मक लेखन</u> :-

आतापर्यंत आपण कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप आणि व्याख्या यांचा विचार केला. कादंबरी हा मानवी जीवनाचे व्यापक दर्शन घडविणारा वाङ्मय प्रकार आहे हे आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात येईल. कादंबरीच्या अनेक व्याख्या आपण पाहिल्या त्यातील नेमाडे यांनी अलीकडे केलेली व्याख्या समर्पक आहे असे म्हणता येईल.

आता सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा थोडक्यात विचार करू. सुमेध वडावाला ( रिसबूड ) हे एक कथालेखक, कादंबरीकार आहेत. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील खेड येथे झाला असून, सध्या त्यांचे मुंबईत वास्तव्य आहे. त्यांनी सुमारे १९८६ पासून लेखनाला प्रारंभ केला. त्यांचे सुरुवातीचे लेखन ' धनुर्धारी ' या वार्षिकात प्रकाशित झाले. ' डुफलिवाले ' ही कथा प्रथम प्रकाशित. नंतर मात्र ' स्त्री ' या मासिकात १९८९ मध्ये ' बाजार ' ही कथा छापून आली. आणि सगळयाच वाचकांचे लक्ष या लेखकाकडे वेधले गेले. त्यांची ' सांजवा ' ( १९९३ ) आणि ' चांदणफुला '( १९९५ ) ही सुरुवातीचे कथासंग्रह, संक्षिप्त मराठी वाङ्मयकोशात प्रभा गणोरकर व इतरांनी संपादित केलेल्या या ग्रंथात रिसबूडांविषयी असे लिहिले आहे की, " वडावाला यांची कथा प्रकृतीने दीर्घत्वाकडे झुकणारी व्यक्ती आणि तिचे अंतर्व्दंव्द मानवी संबंधातली गूढ आणि विलक्षण साखळी गुंफणारे आणि काव्यात्म भाषेचे मोहजाल निर्माण करणारे आहे. जीवनाची गुंतागुंत समजण्याच्या पलीकडची आहे असे त्यांचे भान आहे."[२८] अलीकडच्या काळातील मानवी वासना विकारांचे धीट, परखडपणे आपल्या साहित्यातून चित्रण करणारा आपल्या लेखनाला विशिष्ट शैलीतून साकारणारा लेखक अशी त्यांची प्रतिमा अल्पकाळातच निर्माण झाली आहे. त्यामुळे सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक वाङ्मयाचा अभ्यास करणे या प्रकरणात उपयुक्त ठरेल. त्यांचे एकूण सहा कथासंग्रह असून, पाच कादंब-या प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा या ठिकाणी आपणास थोडक्यात विचार करावयाचा आहे.

**कथासंग्रह** :- ( रिसबूडांचे कथा लेखन )

सुमेध वडावाला रिसबूड यांचे एकूण सहा कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील १. साँजवा - १९९३, २. चांदणफला - १९९६, ३. अंत गोकुळाचा - १९९९, ४. सामक्षा - २००४, ५. चित्र - २००४, आणि ६. ताटी उघडा - २००५. हे एकूण सहा कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यातील सगळेच कथासंग्रह हे स्त्रीजीवनाचे चित्रण करणा-या कथांनी बहरलेले आहेत. त्यांच्या कथा या स्त्रीस्वभावाचे सूक्ष्म पदर, तिच्या अंतरंगातील स्पंदने, व्यथा वेदना, यांचा हळुवारपणे ठाव घेतात. म्हणून स्त्रीच्या मनोधर्माचे चित्रण लेखक उभे करण्यात यशस्वी झालेले दिसतात. त्यांच्या बहुतेक कथा या दीर्घ आहेत. कारण दीर्घकथांमधून संपूर्ण कथानक सविस्तर मांडता येते. त्यामुळे वाचकांसमोर नायक अथवा नायिकेचा जीवनपट मांडण्यात मदत होत असते. असेच आपणास या ठिकाणी म्हणता येईल. या कथासंग्रहांचा येथे थोडक्यात विचार करू.

१. **सांजवा** :- १९९३

या कथासंग्रहाची सुरुवात ही एका ' स्वरमैफलीने ' होते. दृष्टीने अधू असलेले अण्णा संगीताचे जाणकार व संगीत वेडे आहेत. या मैफलीत निरंजन घाटे देखील आपली उपस्थिती दर्शवितात आणि शकुंतलाबाई ' मारवा ' गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध करतात. या कथेतील शकुंतलाबाई एक खडतर जीवन जगत असल्या तरी अण्णांनी दिलेल्या स्वराच्या दानाचे महत्त्व जाणून त्या गातात.मधुर आवाज, निर्भेळस्वर हे त्यांनी दु:खाच्या महापुरात काडीच्या आधारासारखे जपले होते. याच्या बरोबर परोपकारी स्वभाव देखील त्या जोपासतात. अशा शकुंतलाबाई या कथासंग्रहाच्या सुरुवातीला साकारून लेखक ' स्त्रीविषयी ' त्यांचा उदारमतवादी दृष्टिकोन वाचकांसमोर मांडतात.

या कथासंग्रहातील ' आषाढातले चांदणे ' या कथेत एका कुटुंबाचे जीवनचित्रण लेखक साकारतात. त्यात माई, नाना, नमू ( सुनबाई ) आणि त्यांच्या पंचक्रोशीतील अवतारी पुरुष म्हणून प्रसिध्द असलेले गंगाशास्त्री इत्यादी पात्रातून ही कथा साकारते. एका ब्राह्मण कुटुंबाची ही कथा सामाजिक जीवनातील अतिशय नाजूक अशा प्रसंगाला सामोरे जाण्याऱ्या प्रसंगाचे चित्रण करते. नमूचा पती मृत्यू पावल्यामुळे तिला पुरुषाच्या सहवासापासून वंचित राहावे लागते. अशा स्थितीत

ती पुरुषापासून शरीरसुखाच्या शोधात आणि गंगाशास्त्रीसोबत कीर्तन प्रवचनांसाठी सोबत फिरत असतांना त्यांच्यात शरीरसंबंध येतो. त्यामुळे ती गर्भवती राहते. मात्र गंगाशास्त्री हे आपल्या कर्माच्या आधारावर समाजात एक प्रतिष्ठा पावलेले कीर्तनकार आहेत. पण त्यांचा वासनाविकार देखिल लेखकाने या ठिकाणी चित्रित केला आहे. मात्र अशा परिस्थितीत देखील माई आणि नाना तिला सांभाळून घेण्याचा एक अतिशय योग्य आणि धाडसी निर्णय घेतात व आपल्या मुलाच्या मृत्यूच्या आधीचे महिने धरून तिला होणारे मूल हे आपल्याच मुलाचे आहे अशी गावात वार्ता फैलावितात. यातून लेखकाचा दृष्टिकोन अतिशय विशाल असल्याचे आपल्या लक्षात येते.

याच कथासंग्रहातील दुसरी कथा म्हणजे ' वासांसी जीर्णानि ' या कथेत एका वृध्द व्यक्तीच्या जीवनातील उत्तरार्धातील मानसिक स्थितीचे व शरीराच्या वेदनांच्या तीव्रतेचे चित्रण येते. ' बापूसाहेब ' हे वृध्दावस्थेला आणि त्यात झालेला पोटाचा विकार याला कंटाळलेले आहेत. आयुष्यभर कमावलेली संपत्ती ते एका वृध्दाश्रमाला म्हणजेच ' हॅपी होम ' ला देण्याचा निर्णय घेतात. कारण त्यांचा मुलगा आनंद आणि सून ॲनी यांच्या ढोंगी व व्यसनी वागण्याची बापूसाहेबांना चीड येते. ॲनी ही कपटाने सासऱ्याची संपत्ती गिळण्याचा प्रयत्न करते. हे बापूसाहेबांच्या लक्षात येते. स्वतःचे अत्यंत सुंदर घर सोडून ते ' हॅपी होम ' मध्ये राहायला येतात. तिथे त्यांना एक भ्रमिष्ट म्हातारा भेटतो. आणि आश्रमातील लोकांच्या सेवेत गुंतणारी, आनंद शोधू पाहणारी चिदविलासिनी देवी ही प्रवचनातून तत्त्वज्ञान सांगते. ही प्रवचने सगळयांना ऐकावी लागतात. या सर्वांतून ही कथा विकसित होत जाते. शेवटी मरतांना बापूसाहेब आपली संपत्ती हॅपी होमला देण्याचे कारण म्हणजे या ठिकाणी राहणाऱ्या वृध्दांपैकी ज्यांना पैसे भरणे शक्य नाही त्यांना नातेवाईकांकडे सोडले जाते अथवा अनोळखी गावात सोडले जाते. ही स्थिती सुधरावी म्हणून बापूसाहेब हा सर्व खटाटोप चालवितात. आणि स्वतःदेखील शेवटच्या श्वासापर्यंत ' हॅपी होम ' मध्येच राहतात. त्यांना परोपकाराचे महत्त्व कळलेले आहे असे या कथेतून लेखकाने मांडलेले आहे.

' मुखवटे ' या कथेत ' नाटक कंपनी ' च्या कलाकारांच्या जीवनविषयक वास्तव चित्रण रेखाटले आहे. नाटकातील कलाकारांचे वास्तव जीवन आणि कलात्मक जीवन यात भेद असतो.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वेगवेगळेपण असते. हे दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. ' अभिजात ' नाटक कंपनीत काम करणाऱ्या कलाकारांचे नाटकातील काम अत्यंत यशस्वी असले, तरी व्यक्तिगत जीवन मात्र अत्यंत हालाखीचे, गरिबीचे असल्याचे आपणास या कथेतून दिसते. या कथेतील नायिका - ' भावना ' अभिजात कंपनीचे मालक भैय्यासाहेब, देवकर, अनुपमाबाई, कुलदीप, रघुपती - बाळाजी आणि इनामदार इत्यादी पात्रांच्या रेखाटनातून ही कथा साकारते. नाटकाच्या प्रयोगांना या सर्वांच्या कष्टातून यशस्वी केले जाते. म्हणजेच प्राप्त वर्तमानाचा विसर पाडून प्रेक्षकांना मायावी वर्तमानाच्या हिंदोळयावर झुलवणारे सर्व कलाकार आपल्या वास्तव जीवनावर देखील असेच झुलत असतात. सुख दुःखात भैय्यासाहेब एक शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व, इनामदारांच्या वाडयावर आठ दिवस नाटकाचा प्रयोग चालतो. त्यामुळे अनुपमाबाई इनामदारांकडे आकर्षिल्या जातात. तर या वाडयातील ऐश्वर्य आणि मिजास भावनाला खुपत असते. या प्रयोगांमुळे भावनेला आई आजारी असतांना भेटता येत नाही. शेवटच्या क्षणीदेखील तिला आईचे दर्शन होत नाही. याचे दुःख ती उरी कवटाळते. पण नाटकात मात्र त्याची कुठेही अडचण भासू देत नाही. कारण तिला वाटायचे की, " कलाकाराने स्वतःची भावना उरी कवटाळू नये ? असे केले नाही, तर जीवन ' मुखवटा ' वठणार नाही. म्हणजे तो रसिकांवरचा अन्याय, रंगदेवतेच्या पवित्र दरबारीचा भ्रष्टाचार "[२९]

यामुळे ही कथा वास्तव आणि कलात्मकता दर्शविते यांच्यातील भेद कलाकार हे वास्तवातील जीवनात किती ही कष्टी असले तरी त्यांनी वठवलेला ' मुखवटा हा अत्यंत आनंदायीच असतो.

' व्यवहार ' ही कथा देखील असेच करुणमय जीवन साकारते ' आनंदी ' ही या कथेची नायिका तिचे दिवाकर नावाच्या पुरुषावर प्रेम असूनदेखील ती त्याच्याशी लग्न करू शकत नाही. म्हणून शेवटपर्यंत ती कुणाची तरी वाट पाहत राहते. ती एका खाजगी ' मॅक्सन कन्सलटन्सीत ' काम करुन आपले जीवन जगते. त्यामुळे तिला दिवाकरची नसली तरी या कन्सलटन्सीची साथ मात्र आयुष्यात लाभते. म्हणून तिथल्या माणसांपेक्षा तिथली खुर्ची, टेबल, खिडकी आणि घडयाळ यांच्या विषयी तिला विशेष आपुलकी असते.

ऑफिसातील जोशी, रेगेबाई आणि कालिंदी इत्यादींशी कधी सौख्य जुळले नाही. पण ' आसरा ' हॉटेलात मात्र कॉफी घेतल्याशिवाय तिला चैन पडत नसे. कारण तिथेच दिवाकर आणि ती भेटत असत. याच ठिकाणी त्याने तिला लग्नाची मागणी घातली होती. हे तिला नेहमी आठवत राहते. पण त्याच्या व्यवहारीपणामुळे ती त्याला नाकारते. पण नंतर तिला या त्रयस्थपणाने खूप पश्चाताप येतो.म्हणून तिला सजीव व्यक्तींपेक्षा निर्जीव वस्तूंमध्येच जास्त आपुलकी वाटते. नंतर दिवाकर आपली बायको गेल्याचे सांगून तिला पुन्हा एकत्र येण्याचा आग्रह करतो. पण आनंदी मात्र त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करते.

' ए फॉर अस्मिता ' ही कथा आधुनिक काळातील लग्नसंस्थेवर विश्वास न ठेवणा-या ' स्त्री ' चे प्रतिकात्मक रूप. ' अस्मिता ' या नायिकेच्या रुपाने साकारले आहे. अमेरिकेतील इंटरनॅशनल मासिकात काम करणारी अस्मिता भरपूर शिक्षण घेऊन. एका कंपनीची जी.एम. होते. कामगारांविषयी तिला कणव आहे. आयुष्यात सहज असे जीवन ती स्वीकारत नाही. तर ' शॉप फ्लोअर ' ची निवड करून मिळेल ते काम करते. त्यात ती लग्न करण्याचं नाकारते. परंतु आयुष्याच्या मध्यावर तिला आई व्हावसं वाटतं. म्हणून ती कुणाही पुरुषाबरोबर न राहता, टेस्ट ट्यूब बेबीचा विचार करते. त्यामुळे समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. तिला कंपनीच्या मॅनेजमेंटशीदेखील लढा दयावा लागतो. पण ती यातून सावरते. मात्र मुलाने स्वतःचे नाव ' मनिष अस्मिता पारसनीस ' हे बदलून केवळ पी. मनिष असे ठेवले. त्यामुळे तिला दुःख होते ज्याच्यासाठी आपण सर्व सहन केले त्याने ' ए फॉर अस्मिता ' देखील राहू दिले नाही. तसेच तो त्याच्या मित्राची सर्जरी करुन त्याला स्त्री करुन त्याच्याशी लग्न करतो. आणि दुसऱ्याचे मूल ॲडॉप्ट करून घेण्याचा विचार त्याच्या आईला सांगतो. यातून या नायिकेच्या मानसिक स्थितीचे अत्यंत विदारक चित्रण या कथेतून येत जाते.

२. <u>चांदणफुला</u> - १९९६

या कथासंग्रहात एकूण पाच कथा आलेल्या आहेत. यातील सर्वच कथा विषयांच्या बाबतीत विविधता दर्शवितात. पुरुष व स्त्रिया यांच्या मानसिक स्थितीचे चित्रण अत्यंत प्रभाविपणे या कथांमधून येते. संघर्षही येतो. तर उदारमतवादी व्यक्तीदेखील या कथांमधून येत जातात. स्त्रियांचे

दु:ख देखील रिसबूडांनी या कथांमधून रेखाटले आहे. यातं ' बाजार ','पसायदान ',' दान ',' ओळख' ' आणि ' अश्शा जगतो ' अशा विविध विषयांवरील कथा येतात.

' बाजार ' या कथेत एका स्त्रीच्या आयुष्याचा ' बाजार ' पुरुषांनी कशा प्रकारे मांडला आहे. याचे विदारक चित्रण येते. माई अनुसया खोत यांच्याकडे हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाला जातात. त्या ठिकाणी ' वत्सी ' च्या विषयी चाललेली कुजबूज त्यांना सहन करावी लागते. कारण वत्सीचे दापोलीच्या अवधूत वालांकडे लग्न जमवितात. पण माईंना या गोष्टीचा राग येतो. कारण तिला खूप शिकविण्याचा माईंचा निश्चय असतो. परंतु केवळ पाच हजार रुपयांसाठी नाना व वत्साचे वडील गोपाळराव एका क्षय झालेल्या मुलाला बिजवर म्हणून देऊन टाकण्याचा विचार करतात.

पण माई मात्र वत्साच्या आयुष्याच्या मांडलेल्या बाजाराला कडाडून विरोध करतात. कारण तिचे जीवन उदध्वस्त होऊ दयावयाचे नसते. ' वत्सा ' ही स्वतःच्या मुलीच्या सवतीची मुलगी मात्र तिची आई व स्वतःची मुलगी देखील वारल्याने माईनी वत्साविषयी अत्यंत प्रेम म्हणुन त्या जागरुक आहेत. या ठिकाणी स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू आहे. पुरुष तिचा लिलाव अथवा उपभोग घेऊ शकतो. या पुरुषी वृत्तीचे चित्रण लेखक प्रस्तुत कथेतून अत्यंत प्रभावीपणे मांडतात.

' पसायदान ' या कथेतून एका श्रीमंत परंतु आध्यात्मिक जीवनाला वाहिलेल्या इनामदार घराण्याचे नानांचे चित्रण येते. नाना हे या कथेचे नायक ठरतात. कारण नानांनी स्वतःचे जीवन आध्यात्मिकतेला वाहिलेले असले तरी स्वतःचा मुलगा जगजीत व सून अपर्णा ही दोघेही परमार्थापासून आलिप्त असल्याने त्यांना अत्यंत दुःख होते. त्यांची ज्ञानेश्वरी व दासबोध या विषयावरची संशोधने ही अत्यंत प्रभावी आहेत. कारण आजच्या काळातील संदर्भ जोडून रुढ अर्थात बदल करुन त्या शब्दांना वेगळा अर्थ देण्याचा प्रयत्न केल्याचे वर्णन य कथेतून येते. परंतु जगजीत हा व्यसनी असल्याने व वागण्याची शिस्त नसलेला अत्यंत धूर्त त्यामुळे त्याला गरीब व दरिद्री लोकांविषयी तीळमात्र ही कीव न येणारा असा पुरुषी अहंकाराचा आहे. 'माला ' ही नानांकडे ज्ञानेश्वरीचे अर्थ समजून घेण्यासाठी येते. पण अपर्णाला ते आवडत नाही.

नानांना मुलाने कमावलेल्या असुरी संपत्तीची चीड येते ते धिक्कार करतात. व ज्यावेळी या संपत्तीवर पोलिसांची धाड पडते. तेव्हा सगळी संपत्ती जप्त करून घेण्याचा आदेश इन्स्पेक्टर देतो. पण तो पोलिस अधिकारी नानांचे संशोधन बघतो आणि प्रभावित होतो. त्यामुळे आईच्या पीएच.डी. ची अपूर्ण राहिलेल्या इच्छेच्या पूर्तीसाठी तो ते संशोधन नानांकडून मागतो की जे आर्थिक अडचणीमुळे प्रकाशित करू शकलेले नसतात. हे संशोधन नाना त्या अधिका-याला पसायदान म्हणून आणि घराची इज्जत वाचावी म्हणून देऊन टाकतात. व एक नैतिक जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

' दान ' या कथेत रिसबूड यांनी एका आधुनिकतेकडे झुकणाऱ्या कुटुंबव्यवस्थेचे चित्रण साकारलेले आहे. कुटुंबातील जिव्हाळयापेक्षा व्यक्ती स्वातंत्र्यालाच अधिक महत्त्व देणारी आजची तरुण पिढी व त्यांना घरातील कोणाच्याही सुख - दुःखाची कोणतीही पर्वा नसलेल्या पिढीचे चित्रण या कथेतून लेखक साकारतात. शांभवीला व शुभंकर त्यांच्या दोन मुली शालिनी आणि श्यामला या दोन्ही स्वातंत्र्यपणे जीवन जगतात. शुभंकर याने आपल्या मुलींना विज्ञान निष्ट जीवन जगण्यास स्वातंत्र्य दिल्याने त्या अधिकच आधुनिक बनतात. आणि त्यांच्या वर्तणूकीचे दुःख शांभवीला आणि शुभंकर या दोघांनाही होते.

त्यामुळे श्यामला ही आई - वडीलांना न विचारता जीवन बरोबर प्रेम विवाह करून अमेरिकेला स्थायिक होते. तर शालिनी ही तिचा मित्र बच्चूच्या घरी एकटीच जाऊन राहते. या दोघीनांही आपल्या आईच्या किडनीच्या आजाराविषयी थोडीफार देखील आस्था नाही. परंतु शुभंकर मात्र तिला जगण्याविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करतो. शांभवीला व शुभंकर या दोघांनाही मुलींकडून सुख मिळत नाही त्यांच्या बेपर्वाहीपणे वागण्याचा त्रास यांना होतो. मात्र शांभवीला हिला शुभंकर विषयी अधिकच दुःख होते. कारण आपण त्याला दोन वाईट मुली आणि हे आजारपण याच्या व्यतिरिक्त काही देऊ शकलो नाही. असे तिला वाटते. संध्याकाळी फिरायला आल्यावर तिला दिसते ती दान द्यायला आतुरल्यासारखी पानात विखुरलेली काळी नक्षत्र अंगभर घेऊन उभी असलेली जांभळी व घरी आल्यावर एक अनोळखी व्यक्ती. त्याच्या मुलीच्या आजारपणावर खर्च करण्यासाठी स्वतःची किडणी विकण्यासाठी आलेल्या त्या व्यक्तीकडे पाहून

ती अतिशय दुःखी होते. ते म्हणजे आपण नवऱ्याला काहीच ' दान ' देऊ शकलो नाही. यासाठीचे या अस्वस्थतेचे चित्रण लेखक अत्यंत प्रभावीपणे मांडतात.

जीवनातील तोच तोचपणा आणि त्या जीवनाला कंटाळलेल्या सांसारिक स्त्रीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्त्रियांविषयीचे दुःख प्रकट करणारी ' ओळख ' ही कथा म्हणजे एक करुण काव्य आहे. त्याला कंटाळून मुक्तपणे जीवन जगणाऱ्यां विषयीचे आकर्षण या नायिकेच्या रूपाने या कथेतून येते. त्यामुळे या कथेची नायिका वैजयंती देशमुख ही आपल्या रेल्वेस्टेशनवरच्या टेलिफोन बुथला कंटाळून व घरातील आपले आस्तित्व हे शून्यमोलाचे असल्याने, तिला या सर्व बंधनातून मुक्त व्हावे असे सतत वाटत राहते. म्हणून रेल्वे स्टेशवरचे जग म्हणजे स्वैरपणाने, स्वतंत्र असलेल्या व्यक्तीविषयी तिला विशेष आकर्षण वाटते.

मिसरैना हिने लग्नाचे बंधन आपल्या जीवनात बांधले नाही. ती मुक्तपणे जीवन जगते तर सांबशिव हा देखील स्टेशनवर राहून आयुष्य जगतो. त्यानेदेखील बंधनात्मक जीवन नाकारले आहे. त्याची बायको सोडून जाते. तरी तिच्याकडे तो लक्ष देत नाही. म्हणजे कुणीच कुणात गुंतायचे नाही असे वैजयंतीला वाटत राहते.आपल्याच घरातील दुय्यम स्थान व स्वतःच्या मुलाची संपूर्ण काळजी सासूच घेते. त्यामुळे वैजयंतीला त्याच्यापासून दुरावल्यासारखे वाटते. ती स्वतःला दुवा समजते. तिच्या सासरात आजी आणि नातू, बाप आणि मुलगा यांची नाती जुळवण्यापुरती आपली योजना, मुलाला जन्मा घालण्यापुरती असे तिला वाटते. म्हणून घरी जावेसे वाटत नाही. स्टेशनवर भेटलेल्या आंधळया तरुणाला प्लॅटफॉर्म बदलण्याला मदत करते. आणि जातांना तो ' ओळख ' ठेवण्याविषयी तिला सांगतो. न विसण्याची विनंती करतो. तेव्हा मात्र ती अस्वस्थ होते. कारण त्यावेळी आपल्या कुटुंबाची आठवण तिला अधिक तीव्रपणे होते.

सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या ' अश्शा जग तो ' या कथेत दोन स्त्रियांच्या सांसारिक जीवनापासून झालेल्या निराशेच्या व दुःखाच्या आशयाचे वर्णन येते. या कथेतील नायिका आयुष्याच्या उत्तरार्धात सुखापासून वंचित राहते. तर ' दिना ' हीसुध्दा लग्न झाल्यानंरत लगेचच पतीला घटस्फोट देते. कारण तिच्या नवऱ्याचे त्याच्या बहिणीबरोबर संबंध असल्याचे दिनाला

कळते. त्यामुळे दोघींचं दु:ख एकाच प्रकारचे पण माणिक त्याला नशिबाचा भाग समजते. तर दिना या पुरुषांच्या वृत्तीला पशुवृत्ती समजते.

तायडेंच्या घरात भाडयाने या दोघी राहतात. पण माणिकचे पतीकडे येणजाणं सुरू असते. जरी त्याने आपल्या पुतणीशी लग्न केल असले, तरी तिला नवऱ्याविषयी प्रेम असते. या कथेतून स्त्रियांची फसवणूक कशी केली जाते. या विषयी वर्णन येते. पण या दोघी त्याला कठोरपणे सामोऱ्या जातात.

त्याच चाळीतील सदाशिवराव वाघ आपल्या मतिमंद मुलाला व पत्नीला घेऊन राहतात. आणि कष्टमय जीवन जगतात. माणिकला देखील एक मतिमंद मुलगा असतो. पण तो गेल्याने तिला चिंतामुक्त वाटत असते. आणि शेवटी त्या दोघी आनंदात असताना माणिकच्या पतीला दुसऱ्या बायकोच्या मृत्यूमुळे तिसरे लग्न करण्याचा सल्ला देते. पण या गोष्टीचा दिनाला अत्यंत संताप येतो. आणि तिला वाईटही वाटते. यावरुन या कथेतून ' स्त्री ' जीवनातील समस्येवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न लेखकाने केल्याचे दिसते.

३. **अंत गोकुळाचा** :-

सुमेध रिसबूड यांचा ' माणसातील नाती ' हा कायमचा आकर्षणाचा विषय आहे. या नात्यांचा तर्कसंगत रीतीने वेध घेणाऱ्या अनेक लेखकांपैकी सुमेध रिसबूड हे एक गणले जातात. याचा प्रत्यय आपणास ' अंत गोकुळाचा ' वाचल्यावर येतो. या संग्रहातील चारही कथा याचीच पूर्णपणे साक्ष देतात.

' स्त्रीसूक्त ' या कथेत लेखकाने महाभारतातील प्रसंगांच्या आधारे कल्पना शक्तीच्या विस्ताराने वास्तव जीवनातील पुरुषी व भ्रष्ट व्यवस्थेचे चित्रण अत्यंत कुशलतेने केले आहे. गजबजलेले ' गोकुळ ' या कल्पनेतून गजबजलेल्या घराचं चित्रण या कथेतून येते. त्यात सासूसासरे, दीरनणंदा, मुलं भाचरं यांच्या अहर्निश सेवेसाठी झटणाऱ्या घरोघरीच्या बाईलाही चुलीमुलात ' गोकुळ ' दिसावा त्याच्यापलीकडे आत्मप्रगती, आत्मगौरव नावाचं काही चित्र असावं


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अस काही मान्य नाही. तर गोकुळवासीयांना व त्या स्त्रीला सौभाग्यवतीला संसारातच आणि पतीच्या भक्तीतच आपला सुंदर संसार करण्यात धन्यता वाटत होती.

या गोकुळात ( महाभारतात ) ' पूर्णपुरुष ' अथवा ' आदर्श पुरुष ' अशा उपाध्या होत्या तशा ' पूर्णस्त्री ' अथवा ' आदर्शस्त्री ' अशा उपाध्या नावालाही नव्हत्या. या सर्व गोपिकांमध्ये एक गोपिका अत्यंत नाराज होते. तिला कृष्ण पटविण्याचा प्रयत्न करतो.यासाठी कृष्ण त्या प्रगल्भ गोपीला विविध प्रलोभने देऊ करतो. यातून लेखकाने वास्तव जीवनातील राजकीय क्षेत्रातील भ्रष्ट चित्रण अत्यंत कुशलतेने मांडले आहे. त्यावेळी ती गोपी कृष्णाच्या बासरीवर नाच करायला तयार होते. पण तो तिथून गायब होतो. तेव्हा ती रागात इतर सर्व गोपींची जुनी मातीची मडकी फोडते. म्हणजेच लेखकाने या ठिकाणी जुन्या विचारांवर प्रहार केला आहे. एक प्रगल्भ विचार यात मांडलेला आहे. म्हणजे त्यातून प्रबोधन व प्रत्यक्ष कृती राहील. यातून घर, कुटुंब, एक स्त्री आपले योगदान देईल असा विचार सुचविला आहे. म्हणजे पुरुषी, स्वार्थी व भ्रष्टाचारी वृत्तीचा ऱ्हास होईल. अशा प्रकारचा आशावादी दृष्टीकोन या कथेतून प्रकट केला आहे.

' अस्तित्वसूक्ता ' रिसबूडांनी कलावंताच्या अस्तित्वासाठी त्यांनी केलेल्या कलात्मक जीवनातील अतोनात प्रयत्नांची यशोगाथा आहे. त्यातील एक चित्रकार तर दुसरा विनोदकार या दोन्ही कलावंतानी एकमेकांच्या अस्तित्वासाठी एकमेकांच्या कलाकृतीवर टीका करीतच आपले आयुष्य घालविले. त्यांनी आपल्या जवळच्यांच्या अस्तित्वाचा कधीच विचार केला नाही. मग ती स्वत:ची पत्नी जरी असली तरी तिच्या अस्तित्वाची पर्वा या कलावंतानी केली नाही.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार कुलकर्णी हे एका आजाराने त्रस्त. त्यामुळे अस्वस्थ वाटत राहते. आपले पूर्ण आयुष्य त्यांनी चित्रकार म्हणून घालविले. मात्र या आजारपणामुळे त्यांना हॉस्पिटलात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी नाकारलेले असतांनादेखील अनेक प्रिय व्यक्ती त्यांना भेटण्यास येत जातात. कुलकर्णींना मात्र आपला शेवट जवळ असल्याचे सतत जाणवत असते. म्हणून ते गौतमीला ( पत्नीला ) आपले आत्मचरित्र लिहून घेण्यास सांगतात. मृत्यूच्या श्वासापर्यंत फक्त चित्रच डोळयासमोर दिसणाऱ्या या कलावंताला शेवटच्या क्षणी आपल्यापेक्षा ही जगात

अधिक श्रेष्ठ व्यक्ती असल्याचे मान्य करावेसे वाटते. म्हणजे दुस-याचे अस्तित्व जाणवते. म्हणून देवधरांचे विनोद त्यांना श्रेष्ठ वाटतात. त्यांनीदेखील कुलकर्णीच्या चित्रांवर नेहमीच समीक्षा केली. मात्र ते एकमेकांचे अस्तित्व मान्य करतात. एकमेकांना आधार वाटू लागतात. पण या सर्व जगण्यात गौतमीचे स्थान नगण्य आहे. तिच्या अस्तित्वाचा विचार कुलकर्णीच्या लक्षात देखील येत नाही. म्हणून ही अस्तित्वाची लढाई स्वार्थी ठरते.

' मरणसूक्त ' या कथेत एका प्रतिभावंत लेखकाची, मरणाच्या आगमनाची वाट पाहणाऱ्याची ही करूण कहानी आहे. आयुष्यात भरपूर पैसा आणि स्त्री यांचा उपभोग घेऊन सुध्दा उत्तरार्धात त्या कलावंताला अत्यंत गरिबीत जीवन जगावे लागते. अत्यंत घाणरेड्या परिसरात रहावे लागते. हे सारे दुःख उराशी कवटाळून शेवटचे क्षण मोजताना मरणाला कवटाळावे असे सतत या प्रतिभावंत लेखकाला वाटत राहते.

ही कथा वाचतांना वाचकाच्या मनात नायकाविषयी विशेष आदर निर्माण होतो. कारण एका प्रतिभावंताची ही अवस्था म्हणजे त्याच्या आयुष्यातले ते एक अपयशच मानावे लागते. ' सौरभजी ' हे या कथेचे नायक ठरतात. तसेच त्यांच्या घराशेजारी राहणारी गीता आणि त्यांचा मुलगा वैभव इत्यादी पात्रांचा या कथेत वावर दिसतो. आणखीनही काही गौण पात्रातून ही कथा वाचकाच्या मनाचा ठाव घेत जाते.

या प्रतिभावंत साहित्यिकाला कोणीही भेटायला येत नाही. त्याला आपले शेवटच्या दिवसांचे आयुष्य लिहून काढावेसे वाटते. परंतु त्याच्या हातात लेखणी पकडण्याची सुध्दा ताकद उरत नाही. त्या लिखाणाला ते ' मरणसूक्त ' असं शिर्षकही देतात. अवंती ही सौरभजींची पत्नी. तिचा मुलगा वैभव याला ते अवंती ऐवढे प्रेम देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्याच्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. व तो वाममार्गी जातो. व्यसनी होतो. वसुधाच्या सहवासातही ते काही काळ घालवतात. पण नंतर तिच्यापासून लांब जाऊन एकटे जीवन जगण्याचा निर्णय घेतात. त्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात शारीरिक, आर्थिक, मानसिक अशा लौकिक आघाडयांवर पराभूत झालेले सौरभजी लेखन करताना मात्र काही क्षणांपुरत अलौकिक जीवन जगत होते. त्यासाठी त्यांनी ' आत्मानंद ' हे

टोपण नाव धारण केलेले असते. या सर्व कथेतून रिसबूड यांनी लेखकाच्या आयुष्याचा आलेख वाचकांसमोर मांडलेला आहे. सौरभजी स्वतःच्या लिखाणाविषयी म्हणतात, या मरण कळेतून ते कधीच उठू शकत नाहीत व दारिद्रयही त्यांना सहन होत नाही, कारण त्यांनी लेखनाच्या संदर्भात असे म्हटले आहे की, वास्तवदर्शी काही निर्माण करावं, म्हणून त्यांनी अस्तित्व पणाला लावलं. साहित्यनिर्मिती हा छंद न मानता तेच वास्तवातलं आयुष्य मानलं. जगत राहिले. म्हणून समाजाकडे पाठ फिरवलेली. त्यांना या जगाशी कोणतीही तडजोड नको आहे. आपलं वैयक्तिक जीवन त्यांना समाजासमोर मांडण्याचा मुळीच मोह वाटत नाही. म्हणून ते एक प्रतिभावंत साहित्यिक मानले गेले. अशा प्रकारचा आशय या कथेतून व्यक्त होतो.

' पुरूषसूक्त ' या कथेत लेखकांने पुरूषांचे गुणगान केले आहे. आप्पांच्या पत्नीच्या मृत्यूनंतरसुध्दा आपल्या संसाराची २५ वर्षे अत्यंत आनंदाने व मुलांची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडून व स्वतःच्या प्राध्यापकाच्या जबाबदारीत कोठेही न खंड पडू देता, स्वतःच्या कुटुंबाला आनंद देत स्वतःही आनंद शोधण्यात या कथेच्या नायकाचे जीवन या कथेत येते. घरातील सर्व कामं स्वतः आप्पा करत. तसेच ज्ञानिया व विकर्ण ही दोघं मुलं व चिद्‌धना जिवंत नसलेली त्यांची बायको, यांच्यावर ते भरपूर प्रेम करतात.

आप्पा हे घरातील प्रमुख व्यक्ती तर मुलगा ज्ञानिया हा ' आरंभ ' या वर्तमानपत्राचा सबएडिटर, तसेच विकर्ण हा एक प्रतिभावंत चित्रकार. एवढेच कुटुंब आणि या कुटुंबाशी संबंधित शकुन आणि ईशा जी ज्ञानियांवर प्रेम करते. ज्ञानियाच्या परखड व स्पष्ट लिखाणामुळे त्याला विविध अडचणींना व समस्यांना सामोरे जावे लागते. तो प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीस आणतो. त्यातही आप्पांची साथ त्याला मिळते. तर विकर्ण एक चित्रकार असून तो विविध विषयांवरची चित्र काढून आपला नावलौकिक करतो.

इशा आणि ज्ञानियांचे संबध जरी असले तरी आप्पांच्या व्यक्तिमत्त्वावर ती प्रेम करते. तिला त्यांच्या सहवासाची गरज वाटायला लागते. परंतु आप्पा तिला या वेडयाभाबडया भावनिक जाळयातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात. म्हणून संसारी जीवनाच्या पंचवीशीच्या वाढदिवसाला

शकुन त्यांना एक पुस्तक भेट म्हणून देतो. त्यावर त्याने आप्पाविषयी गौरवात्मक शब्द लिहलेले असतात. ते असे " धर्मपत्नी गेल्यानंतर कोणताही अधर्म न करता पंचवीस वर्षे संसाराचे सुंदर ' पुरुषसूक्त ' गाणाऱ्या ' आप्पा ' नावाच्या विश्वरूपी महापुरुषाला आदरपूर्वक सप्रेम भेट "[३०] यातून पुरुषाच्या उदात्तीकरणाचे दर्शन लेखक या कथेच्या साहाय्याने वाचकांस घडवितात.

४. **सामक्षा - २००४** :-

सुमेध रिसबूड यांचा ' सामक्षा ' हा कथा संग्रह म्हणजे वेगवेगळया विषयांवरती प्रकाश टाकलेली एक लोकप्रिय साहित्य कृती आहे. या साहित्यकृतीतून लेखकाने समाजातील विविध समस्यांचा परामर्श घेतलेला आहे. यात एकूण पाच कथा असून त्यापैकी ' अनवाणी ' ही कथा म्हणजे एका लहान मुलाच्या आयुष्यात दुरावलेल्या आईमुळे त्यांच्या मनाची जी घालमेल होते, त्याचे चित्रण करते. तर शेवटच्या कथेत म्हणजे ' मोल ' या कथेतून ' समलिंगी संभोग ' ही समाजिक विकृती असून तिच्यामुळे होणाऱ्या पुरुषांच्या मानसिक वैफल्याचे चित्रण लेखक वाचकांना दर्शवितात. म्हणून हा कथा संग्रह एक वेगळेपण दर्शवितो.

' आदिमाया ' या कथेची नायिका ' यशोदा ' ही सुप्रसिध्द लेखिका आहे. तरीसुध्दा ती अतिशय यशस्वी स्वरूपात आपला संसार करते. परंतु तिच्या पतीच्या अहंकारी स्वभावामुळे आणि पुरुषी वृत्तीमुळे ती केवळ घरातील एक अस्तित्वशून्य असे व्यंक्तित्व बनते. तिला मुलगा व सून यांच्याकडून कोणत्याच प्रकारे स्थान घरात मिळत नाही. केवळ वडिलांनाच कुटुंबाचे कर्ते धरते मानले जाते. याचे दुःख यशोदाला होते. आणि केवळ आपले दैव म्हणून ती हे सर्व स्वीकारते. परंतु जेव्हा तिचा ' अहंभाव ' जागृत होतो त्यावेळी मात्र ' आदिमायेचे ' रूप धारण करते.

यशवंतराव गोगटे एका विमा कंपनीतून सेवानिवृत्त झाले आहेत. आपल्या लग्नाची ५० वर्षे झालीत तरीदेखील बायकोकडून शरीर सुखाची मागणी या गोष्टीचा यशोदाला अतिशय राग येतो. कारण आपल्या आवडीनिवडीचा कुठलाही विचार नसलेल्या पतीविषयी तिच्या मनात चीड निर्माण होते. आयुष्यात कधीच आपल्याला पुढे जाऊ दिले नाही. केवळ घरातच आयुष्य घालवले

म्हणून स्वतःच्या सांसारिक जीवनातून प्रेरणा घेऊन ती लिखाण करण्यास सुरुवात करते. संसाराची पन्नाशी साजरी करतांना देखील मुलगा व सून हे वडिलांनाच यशस्वी संसाराचे श्रेय देतात. केवळ समाजापुढे कृत्रिम शब्दांतून यशोदाच्या लिखानाविषयी गुणगान करतात. कारण यासाठी मुलांकडून दारू पिण्याचे ' प्रॉमिस ' घेतलेले असते. त्यावेळी मात्र यशोदाला अत्यंत वाईट वाटते. कारण आपल्या अख्ख्या आयुष्यातील कष्टाचे मोल केवळ एका दारूच्याप्याला एवढेच आहे असे ठरविण्याबद्दल यशवंतरावाविषयी चीड निर्माण होऊन तिच्यातील ' आदिमाया ' जागृत होते. याचे दर्शन यशवंतरावांना ती दाखवते.

' अनवाणी ' या कथेत रिसबूडांनी आईच्या प्रेमापासून दुरावलेल्या मुलाच्या मानसिक अवस्थेचे आणि आपली मुलगी स्वतःच्या मुलाला सोडून केवळ पुरूषाचा सहवास लाभावा म्हणून त्याच्याकडे जाऊन राहते. याविषयी त्या मुलाच्या आजीच्या भावनिक स्थितीचे अत्यंत करूणमय चित्रण साकारण्याचा यशस्वी प्रयत्न रिसबूडांनी या ठिकाणी केला आहे.

' वायूनंदन ' त्याची आजी, ' आजोबा ', त्याची आई ' आयशी ' वडिल वर्धमानराव व वायुनंदनची मैत्रिण हर्षा आणि तिची आई आणि दौलतराव अशा विविध पात्रांतून ही कथा आकाराला येते. वायुनंदनच्या मुंजीचा कार्यक्रम असल्याने हर्षा व तिची आई दोघीही येतात. परंतु दौलतरावांच्या धाकामुळे मात्र आयशी येण्याचे टाळाटाळ करते. या आईच्या स्वभावामुळे वायुनंदन रागावतो. त्याला वाटते अनवाणी जीवन असले तरी काय झाले ? राम, लक्ष्मण आणि सीता ही देखील वनवासात अनवाणीच फिरण्यात धन्यता मानीत होते. म्हणजे पायात पादत्राणे नसले की, मोकळे-मोकळे वाटते. त्याप्रमाणेच जीवनात कोणाची माया नसली तरी अनवाणी जीवनसुध्दा जगात येऊ शकते असे वायुनंदनला वाटतं.

कारण त्याची आई ही स्वतःला नाथ शोधण्यात आपल्या मुलाला अनाथ करतो आहोत याचा विचारदेखील करत नाही. परंतु वायुनंदनचा स्वभाव खेळाडू आणि वृत्ती आनंदी असल्याने व प्राण्यांची, पक्ष्यांची संगत आवडत असल्याने तो आनंदी असतो. परंतु आईची आठवण सतत त्याला अस्वस्थ करत राहते. त्याच्या मुंजीला हर्षा, तिची आई व भजनी मंडळातील सर्व बायका

येतात. त्याची आई येणार म्हणून तो तिची वाट बघत असतो. त्याचे पूजाविधीकडे अजिबात लक्ष नसते. परंतु आई आल्यावर त्याला मायेने जवळ न घेता एक त्रयस्थ व्यक्तीसारखी त्याच्याशी व्यवहार करते. म्हणून तो नाराज होतो. म्हणून मातृभोजन देखील तिच्या हातून घेत नाही. त्याची मनस्थितीही द्विधा होते. कारण आई आणि आजी या दोघींनाही तो सोडू शकत नाही. पण आयशी मात्र त्याच्या जवळ राहण्याचे नाकारते आणि पुन्हा पुण्याला निघून जाते. त्यामुळे त्याची आजी तिच्याशी भांडते व आपला क्रोध व्यक्त करते. या कथेतून एका अनवाणी अवस्थेत जगणा-या मुलाविषयीचे शोकात्मक जीवन रिसबूड अत्यंत ताकदीने मांडतात.

' अंशमात्र ' मध्ये एका गजलकाराच्या ' गजल ' चोरून त्या स्वतःच्या नावे प्रकाशित करून स्वतःला गजलकार म्हणून मिरवण्यात धन्य मानणाऱ्या श्रीमंती व्यक्तीचे त्याच्या काव्यचौर्य वृत्तीचे प्रतिकात्मक चित्रण या कथेतून येते. या कथेचा नायक एक नामवंत लेखक आहे. आणि त्याचा मित्र हा साहित्याचा जाणकार असून साहित्यिकांचा चाहता आहे. या व्यक्तीशी मैत्री करण्यात सगळे कलावंत स्वतःला धन्य मानतात. अशा प्रकारचे आशयसूत्र असलेली ही कथा साहित्य क्षेत्रातील या विकृतीचे दर्शन घडविते.

' जन्म कोरडा पाषाण ' या कथेत लेखकाने दूरदर्शन आणि वर्तमानपत्रातील काम करणा-या व्यक्तींच्या संघर्षमय जीवनाचे तसेच त्यांना येणाऱ्या अडचणी आणि दूरदर्शन क्षेत्रातील कामाच्या चढउताराचे, त्याचबरोबर तिथल्या भ्रष्ट व्यक्ती व काम मिळावे म्हणून कोणत्याही प्रकारची कामे करून घेण्याची वास्तव जीवनातील चित्रण कथेतून रिसबूड मांडण्याचा प्रयत्न करतात. या कथेत दोन स्त्रिया या आपल्या कर्तृत्वाने आणि प्रयत्नाने यशस्वी होतात. एक पत्रकार तर दुसरी दिग्दर्शक म्हणून काम करतात. यांच्या व्यतिरिक्त विविध कंपन्यांचे मालक, सी.ई.ओ आणि वृत्तपत्र क्षेत्रात काम करताना मिळणाऱ्या धमक्या यांच्याव्दारे ही कथा वाचकांच्या मनाचा ठाव घेते.

' मोल ' या कथेतून लेखकाने वाचकांसमोर वेगळाच आशय मांडला आहे. या कथेत ' समलिंगी उपभोग ' या विकृतीचे दर्शन लेखक कथेतून घडवितात. हा एक ' बॉयोसेक्शुअल '

16395

रोगाचे प्रतिकात्मक दर्शन नायकाच्या माध्यमातून लेखक घडवितात. म्हणजे एखादया लहान मुलाला लैंगिक शोषणाचे बळी व्हावे लागते आणि त्याचा परिणाम हा मोठेपणी त्याला भोगावा लागतो. याचा विचार या कथेतून येतो. या कथेचा नायक ' सुनयन ' हा एक लोकप्रिय व यशस्वी लेखक तर त्याचा मित्र अभिदीप हा ' जनप्रवाह ' या सुप्रसिध्द साप्ताहिकाचा संपादक. वयाच्या १४ व्या वर्षी सुनयन एका तीस वर्षीय पुरुषाच्या लैंगिक शोषणाला बळी पडतो. त्यामुळे अनेक दिवस अपराधीपणाचा भाव त्याच्या मनात घर करुन बसतो. आणि त्यामुळे त्याला पुढे पुरुष उपभोगण्याची सवय लागते. म्हणजे तो बॉयसेक्शुअलने पिडित व्यक्तीचे चित्रण करतो. या कथेचा आशय नवीन असला, तरी लेखकाने अतिशय कुशलपणे मांडला आहे.

५. <u>चित्रं - २००४</u> :-

या कथा संग्रहात ' स्मृतिचित्रं ' आणि ' विस्मृतिचित्रं ' अशा दोन दीर्घ कथा आहेत. यापैकी पहिल्या कथेत एका ' स्त्री चे जीवन व त्या जीवनाबरोबर घडणाऱ्या घटना, प्रसंगाचे त्याच्यावर होणारे परिणाम येतात. त्यामुळे लेखक स्त्रीस्वभावाचे सूक्ष्म पदर, तिच्या अंतरंगातील स्पंदने, व्यथा, वेदना यांचा हळुवारपणे ठाव घेण्यात यशस्वी झालेला आहे. म्हणजेच या कथेत समाजाच्या दर्शना बरोबरच स्त्रीच्या मनोधर्माचे चित्रं उभ करण्यात समर्थ ठरले आहे.

सुमेध रिसबूड यांची ' स्मृतिचित्र ' ही कथा ' स्त्री ' जीवनाचे भावनिक दर्शन घडविते. या कथेची नायिका, तिचा मुलगा गजेंद्र, भंप्या, भंप्याची आई, अनाथ आश्रमात व्यवस्थापक म्हणून काम बघणाऱ्या वागळेबाई, वैदय सराफांची आजी आणि त्यांच्याकडे कामाला येणाऱ्या रंगूताई इत्यादी पात्रांच्या योजनेतून ही कथा विकसित होते. गजेंद्रची आई आयुष्यभर नवऱ्याच्या आज्ञेबाहेर जात नाही. म्हणजे स्वतः कोणताही निर्णय घेत नाही. परंतु नवरा गेल्यानंतर मात्र त्या स्वतः निर्णय घेण्यास समर्थ होतात. आपल्या आयुष्यातील अनुभव लिहिण्यास सुरुवात करतात.

गजेंद्रच्या आई ' सागर केटरर्स ' कडे कामाला जातात. स्वतःचा मुलगा म्हणजे ' गजेंद्र ' अमेरिकेत नोकरी करत असतांनादेखील त्या स्वतः एकटया राहून जगतात. तो कुटुंबापासून दुरावतो. कारण एका पंजाबी मुलीशी लग्न करून तिथेच स्थायिक होतो. गजेंद्र वडिलांना शत्रू

समजत असे. कारण त्याच्या वडिलांचा तत्त्वनिष्ठपणा त्याला आवडत नाही. म्हणून तो वडीलाच्या मृत्यूपश्चातदेखील येत नाही.त्याला आई ' सागरकेटरर्सकडे ' कामाला गेलेली आवडत नाही. परंतु तिला वाटते की, आर्थिक गरजेबाहेरदेखील काही माणसात, समाजात, मिसळण्याची, सहवासाच्या संवादाच्या अशा गरजा असतात. त्यामुळे ती कामाला जाते. मात्र सागर केटरर्सचे सर्व पैसे त्या अनाथ आश्रमाला देणगी म्हणून पन्नास हजार रुपये देऊन टाकतात. म्हणून वागळेबाई त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करतात.

भंप्या दारुडा असला आणि त्याच्या आईचा स्वभाव बडबडेपणा असला तरी त्यांचा सहवास हवाहवासा वाटतो. कारण गजेंद्रचे वडील जातात, तेव्हा पाणी देण्यापासून ते सर्व विधी भंप्या पूर्ण करतो. म्हणून त्यांना गजेंद्रपेक्षा भंप्या अधिक जवळचा वाटतो. तिचे चाळीतले घरदेखील तिला आवडते. त्या घरात राहूनच त्या ' सागरकेटरर्सकडे ' कामाला जातात. विविध ठिकाणच्या लग्नात विविध पेहराव करावे लागतात. या लग्नातील कामाच्या ठिकाणी व्यक्ती दररोज चांगले अन्न खाते. पण इतरांना निकृष्ट अन्न खावे लागते. पण शिल्लक अन्न घरी दिले जात नाही. तसेच बँडवर संगीत, गाणी वाजवून बरातीत आनंदच आनदं उतू जाऊ देणाया राजा प्रधानासारखे अंगरखे ल्यालेल्या बँडवाल्यांपैकी बहुतेकांच्या घरी दारी नाना समस्या बेसुरी असतात. याचा अंदाजही येत नसावा. हे वास्तव या कथेतून येते. याला गजेंद्रच्या आई ' औट घटकेची श्रीमंती ' हे नाव देऊन लिखाण करते.

वैदय सराफांकडे नायिकेला मोत्याची नथ मिळते. पण त्या वागळेबाईना ती नथ देऊन टाकते. त्यांना मोह अजिबात नसतो. पण स्वभिमानीपणा त्यांच्यात रुजलेला असतो. भंप्याची आई, रंगूताई, वैदय सराफांच्या आजी, वागळेबाई आणि स्वतः! अति कनिष्ठ वर्ग ते कुबेर श्रीमंती असलेल्या अशा सर्व स्तरातील बायका ' पंचकन्या ' वाटतात. कारण त्यांनी प्रहारधर्म जोपासला म्हणून पंचकन्या त्या काजव्याप्रमाणे आपापल्या संसारात चमकतात. ही सर्व स्मृतीचित्रं कायम जिवंत राहतात."



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

' विस्मृतिचित्र ' या कथेत ' मुंबई महानगरा ' चे आणि कोंकणातील ' खेड ' च्या निसर्गाच वर्णन, तेथील बदलते पर्यावरण, आधुनिकीकरण, तिथला बदलता समाज, कौटुंबिक वातावरण यामुळे होणारी नायकाच्या मनाची जडण - घडण सूक्ष्मपणे कथेतून येत जाते. या कथेचा नायक स्वतःचे चरित्र लिहिण्याचा निश्चय करतो. त्यासाठी त्याला जन्मगाव आणि तेथील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती बघणे आवश्यक वाटते. म्हणून मुंबईमधल्या नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी खेडला जाण्याचा निर्णय घेतो.

निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून घरी आल्यावर तो बायकोला खेडला जाण्याचे सांगतो कारण आता त्याला ' असायल्म् व्हीजन ' मध्ये जावयाचे नसते. त्याचा मित्र आदित्य देखील त्याच्यासोबत जाण्यासाठी तयार होतो. आदित्य आणि श्रीरंग हयांचे जन्म, बालपण , शिक्षण, नोकरी, लग्न आणि राहण्यासाठी ब्लॉक्स देखील एकाचवेळी व जवळजवळ घेतात. तसेच मुली ही सारख्याच होतात. ज्याप्रमाणे झेरॉक्स कॉपी आपले जीवन रंगत जाते. त्याप्रमाणे त्यांचे जीवन रंगत जाते. म्हणून त्यांना अखेरचा श्वासही एकसाथ घ्यावा असे वाटते. श्रीरंगची बायको श्रीकला तर आदित्यची बायको आदिती. दोघीना मात्र या बाबतीत चिंता वाटते, की हा मानसिक रोग आहे की काय?

श्रीरंग व आदित्य खेडला येतात. त्याच्या घरी काका व काकू असतात. तर आदित्याच्या घरी मात्र कुणीही नसते.त्याचे घर भाडयाने दिलेले असते. खेडमधील सर्व आठवणी ताज्या होतात. अगदी चहाची टपरी, वडाचे झाडं परंतु यापैकी काही दिसत नाही कारण खेडमध्ये संपूर्ण बदल झालेला त्यांना दिसतो. टपरी असलेल्या ठिकाणी आता भलमोठे हॉटेल झाले आहे. चंद्रमणी गौडा हा त्याचा मालक असतो.चंद्रमणी हा सामाजिक दृष्टिकोन ठेवतो. कारण किल्लारी भूकंपातील अनाथ मुलांना ' किल्लारी ' नावाची इमारत बांधून तिथे त्यांची व्यवस्था करतो. त्यांच्यासाठी गोष्टी, संस्कारवर्ग, स्तोत्र इत्यादी उपक्रम चालवतात.

खेडमध्ये फिरत असताना विस्मृतीत गेलेल्या सर्व घटना चित्रं श्रीरंगच्या डोळयासमोर उभे राहते. तसेच नारंगी नदी, बाजार, भात शेती, आपटयांचं हॉटेल, एस.टी.स्टॅंड, जीवन शिक्षण

विद्यामंदिर, लेण्या, एल.पी.इंग्लिश स्कूल, गणपती देऊळ, खेडजाई, रेडजाई, रामाचं, लक्ष्मीनारायणांचे देऊळ इत्यादी सर्व आठवते. इथले सारे संदर्भ वेगळे होते. इथल्या आयुष्यात जगलेली,स्पर्शिलेली प्रत्येक गोष्ट, जागा ही आत्मचरित्राच्या दृष्टिने श्रीरंगला महत्त्वाची होती. पण चंद्रमणीचे जीवन बघितल्यावर स्वतःचे चरीत्र लिहिण्याचे विचार श्रीरंग बाजूला ठेवतो आणि ' तिसरा डोळा ' या नावाने चंद्रमणीचे चरित्र लिहिण्याचा निश्चय करतो. व या विस्मृती चित्राची माहिती गोळा करण्यास सुरुवात करतो.

६. <u>ताटी उघडा : २००५</u>:-

सुमेध रिसबूड यांचा हा कथासंग्रह एका कादंबरीचा विस्तृत आणि खोलवरचा परिणम घडवून आणण्याची विलक्षण ताकद असलेला आहे. कारण यातील पाचही कथा या दीर्घकथा आहेत. या कथांमधून मानवी मनाचे पापुद्रे उलगडण्याचा लेखकाचा मुख्य उद्देश आहे. तसेच ' स्त्री ' हा देखील या कथामधला प्रमुख गाभा आहे. स्त्रीवेदना दाहकतेने प्रकट होते. म्हणून या संग्रहातील प्रत्येक पात्राच्या मनाच्या तळाशी जातांना त्यातील प्रसंगरचना, वातावरण निर्मिती, आशयघनता, शैलीतील मोहकता इत्यादी साऱ्या अंगाचे दर्शन या सरस व सुरस कथांच्या वाचनातून लक्षात येते.

' पुनर्भेट ' ही कथा एका नायिकेची करुण गाथा आहे. कारण नायिकेच्या लहानपणी ज्या ठिकाणी तिला भरपूर आनंद आणि खेळण्यास मिळत असे. ते आता त्या ठिकाणच्या पुर्नभेटीनंतर तिला जाणवत नाही. त्यामुळे तिचे मन अस्वस्थ होते. इथल्या प्रत्येक घटकात बदल झाल्याने तिला परकेपणाचा भास होतो. कमळीताई आता म्हातारी झाल्याने तिचा सहवास नायिकेला लाभत नसल्याने व कमळीताईच्या घरातील झोपाळा जीर्ण झाल्याने ती निराश होते.

मनी या कथेची नायिका माहेरी मुंजीच्या कार्यक्रमाला येते. आणि त्या वातावरणामुळे तिला भूतकाळातील आपले लहानपण आठवते. त्यातील तिला आपले वाटणारे कमळूताईचे घर तेथील नाका, नाकेदार, शाळा, विविध खेळ, लगोरी, सोंगटया,खापरीचा डाव, तिचे भावंड तिची मैत्रीण - ईला आणि रामप्रसाद हे सर्व आठवत राहते. त्यामुळे तिची अस्वस्थता वाढते. तिला आवडणारा पारिजाताचा वृक्ष आता निष्पर्ण झाल्याने ती दुःखी होते. कमळीताई म्हातारी झाल्याने तिला

ओळखत नाही. परंतु ' मनी ' स्वतःची ओळख करून देते. मनीला कमळीताई झिजलेल्या चंदन खोडा प्रमाणे भासते. मात्र त्या ठिकाणच्या या सर्व आठवणीतील कोणत्याच घटकांची ' पुनर्भेट ' नायिकेला होत नाही.

' उपनिषद ' ही कथा एका आंधळया नायकाचे चित्रण करते. परंतु आंधळेपणामुळे तो स्वतःला कमी लेखत नाही. दुसऱ्याचा आधार बनण्याचं त्याच धाडस असते. या नायकाला आई गेल्यापासून वडीलांकडून दोन प्रेमाचे शब्दही ऐकायला मिळत नाहीत. परंतु वडीलांबद्दल त्याला आदर असल्याने तो त्यांच्या आजारपणात ही काळजी घेण्यास समर्थ असतो.

या कथेचा नायक दिनकर ( दिनू ) टेलिफोन बुथ चालवून समाजातील विविध लोकांशी आपले संबंध विकसित करतो. त्याला या लोकांविषयी आत्मियता असते. त्याला उच्च नीचता मान्य नाही. कारण अडचणीत आलेली चारावांलीला तो वाचवितो. मात्र ' निओलिन ' विषयी त्याला विशेष आदर असतो. तिच्यावर त्याचे प्रेम असते.

दिनकरचा पूर्ण दिवस टेलिफोन बुथवर जातो. त्याच्या बुथसमोर ' एव्हरेस्ट क्लास ' चालतो. तिथल्या मुलांशी त्याची मैत्री असते. त्याची एक सवय म्हणजे तो बुथचा नंबर कोणासही देत नाही. त्याची आई ( आक्का ) गेल्यापासून त्याला आयुष्य हे कुठेतरी कमी असल्यासारखे जाणवते. परंतु ' निओलिन ' ही त्याच्याशी मैत्री करते. त्यामुळे तिच्याविषयी तो अत्यंत हळवा बनतो. त्यांच्यापेक्षा वयाने मोठी असतांना देखील त्याला तिच्याशी लग्न करावेसे वाटते. वडिलांची त्याच्यावर माया नसते. ते व्यवहारी वागतात.

परंतु दिनकरचे वडील ' अजिंक्य साहेब ' हार्ट ॲटॅकने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतात. तेव्हा त्याला वाटते की, कोणावरही प्रेम न करणाऱ्या साहेबांना हार्ट आहे. याचेच आश्चर्य वाटते. परंतु ' उपनिषदा ' चा अर्थ त्याला ठावूक असतो. तो म्हणजे जवळ असणे, सान्निध्यात राहणे कारण जोशी काकींना रम्याची साथ, चारावालीला तिच्या नवऱ्याची साथ, महारोगी भिकारीला त्याच्या बायकोची साथ, तर आपल्याला कोणाची साथ ? असा प्रश्न पडतो. म्हणजे त्याच्या सान्निध्यात कोणी राहणार नाही म्हणून तो तात्काळ वडिलांच्या मदतीला हॉस्पिटलकडे जातो.

' पूर्ती ' या कथेत लेखकाने लोप पावत चाललेल्या संस्कृतीचे व संपत्तीमुळे होणा-या अहंकाराचे दर्शन घडविले आहे. या ठिकाणी आयुष्यभर दुसऱ्यांसाठी झटणारे आबासाहेब. तर त्याचा मुलगा अधर्माच्या मार्गी लागून व प्राण्यांची हत्या करून श्रीमंतीच्या हव्यासापोटी गाईच्या कातडीचे व हाडांच्या पावडरीचे व्यापार तो ' गोधन एक्सपोर्ट ' च्या नावे चालवितो. वडिलांच्या श्राध्दाच्या दिवशी त्यांच्या घरात भ्रष्ट पुढाऱ्यांना आणून एका समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करतो. मात्र ' ब्राह्मण भोजन ' त्या दिवशी दिले जात नाही.

महिपती व त्याची बायको भैरवी हे आबांच्याविषयी आदर ठेवत नाहीत. तर माईकडे ते विशेष लक्ष देत नाहीत. नवं घर बांधण्यासाठी जुने घर पाडून त्याच्या आजूबाजूचे सर्व वृक्ष तोडले जातात. याचे दुःख माईना होते. महिपती आदिवासींच्या जमिनी अत्यंत कमी किमतीत विकत घेतो. या भूमिपुत्रांना महिपती लुबाडतो. या संपत्तीत चैतन्याची एकही खूण नसल्याचे माईंना जाणवते. कारण एका गर्भार भिकारीणीला ते अन्न वाढत नाहीत. म्हणून आई स्वतःचे ताट तिला देऊन आबासाहेबांच्या पूर्तीचे अथवा स्वतःच्या इच्छेपूर्तीचे समाधान मिळविते.

' ऐश्वर्यवती ' या कथेतून नायिका ' संथा ' चे दुःख प्रखरपणे व्यक्त होते. तिच्या आयुष्यात आलेले अपयश लेखक वाचकांना दर्शवितात. एका वर्तमानपत्रात काम करुन, लिखाणाची आवड म्हणून चित्रपट किंवा पुस्तकांवर आपले परीक्षण

लिहिते. म्हणून ' संथाला ' वेदवती तिची आत्मकथा लिहिण्याचा आग्रह करते. म्हणून ती श्रेष्ठजींची व वेदवतीची आत्मकथा लिहिते मात्र नंतर पुस्तकावर लेखिका म्हणून वेदवती स्वतःचे नाव घालते याचे संथाला अतिशय दुःख होते.

' संथा ' स्वतःचे अनुभव डायरीत लिहुन काढते. हे ती भावदीप व मैत्रीण सपनाला सांगते. भवदीप हा तिच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असला, तरी तिच्यावर प्रेम करतो. संथा वेदवतीची आत्मकथा लिहिण्यात भरपूर कष्ट घेते. श्रेष्ठजी एक स्वातंत्र्य सेनानी व ' जनहित ' या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक त्यांचे जीवन कार्य जगात आदर्श निर्माण करणारे म्हणून वेदवतीला आत्मकथा

लिहावीशी वाटते. त्यामुळे ती ' संथाला ' आग्रह करते. भवदीपची पत्नी म्हणून न जगता स्वतःचे कर्तृत्व दाखवायचे म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्याची जिज्ञासा. ' जैन ब्रदर्स ' भवदीपला चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याविषयी प्रस्ताव मांडतात. त्यामुळे तो कथा लिहिण्याचा संथाला आग्रह करतो. परंतु वेदवतीची आत्मकथा लिहुन झाल्यावर वेदवती पुस्तकावर स्वतःचे लेखिका म्हणून नाव घालून, मुख्यमंत्र्यांच्या हातून प्रकाशित करते. पुस्तकाच्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा कोणत्याच आवृत्तीवर ' संथा ' च्या नावाचा उल्लेख नसतो. हे सर्व ती आपल्या डायरीत लिहिते. अभिनेत्री होण्याचं तिचं स्वप्न खोटं ठरतं. कारण वेदवती येतात. त्यादेखील तिचं आणखीनं एक स्वप्न छिनून घेण्यासाठी, पंख छाटून टाकण्यासाठी. ही डायरी सपना वाचून भवदीपला सांगते. व याच कथेवर चित्रपट बनविण्याचे तिला सांगतो. यातून वाङ्मयचौर्याचा व आपल्या सुप्त ईच्छा पूर्ण करण्याच्या वृत्तीचे दर्शन होते.

-

' गाथा ' ही कथा एका प्रेमविवाह झालेल्या नायिकेच्या सांसारिक अपयशाची गाथा आहे. ही जीवनगाथा तिला पतीच्या नाकर्तेपणामुळे सहन करावी लागते. म्हणून ती बंड करते. तिचा नवरा आईच्या आज्ञेत व तिच्या पदराआड जगत असल्यामुळे पत्नीच्या आवडीनिवडी, कौटुंबिक अडचणींना सामोरे जाण्याच धाडसं त्याच्यात उरत नाही. म्हणून ती त्यावर ' नपुंसक ' म्हणून कोर्टात आरोप करते.

या कथेची नायिका ' सुरभी ' ही प्राध्यापक आहे. परंतु संसारात अतिशय दक्ष. पण सासूच्या जाचाला कंटाळून व तिच्या आईच्या किडनीच्या आजारामुळे माहेरी येऊन राहते. परंतु सुजन व तिच्यात या घटनेमुळे वादावादी निर्माण होते. म्हणून तो घटस्फोट घेण्यासाठी कोर्टात केस दाखल करतो. मात्र सुरभीला आपल्या तीन वर्षाच्या मुलीसाठी संसार करावयाचा असतो. आईच्या तब्बेतीची काळजी घेते. परंतु हे तिच्या सासूला सहन होत नाही. जिने सर्व आयुष्य गरजू बायकांसाठी घालविले, त्या बाईला शेवटी दुःखाला सामोरे जावे लागते असे सुरभीला तिच्या आईच्या बाबतीत वाटते. तर सुजनला हे सहन होत नाही. त्याने स्वतः कधीही निर्णय घेतलेला नसतो. तो आईच्या पदराखाली व पंजात जगतो. म्हणून ती कोर्टात त्याच्यावर 'नपुंसक' असल्याचा आरोप करते. शेवटी ती तिच्यावरचे झालेले शारिरीक व मानसिक अत्याचाराची गाथा

न्यायाधिशांसमोर वाचून दाखविते. तिच्या संसाराच्या हक्काचे, अधिकाराचे विदारक चित्रण या कथेतून येते. म्हणून ही गाथा वाचकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून बसते.

**रिसबूडांचे कादंबरी लेखन** :-

सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या सुरुवातीच्या काळातील लेखना विषयीचा विचार केला, तर त्यांनी कथा लेखनापासून साहित्यिक जीवनाची सुरुवात केलेली दिसते. पुढील काळात मात्र कादंबरी या वाङ्मय प्रकाराकडे ते वळलेले दिसतात. कारण त्यांना वाटले की एखाद्या घटनेचा विस्तार कथेतून मांडताना कथा ही आकाराने लहान वाटली असावी. म्हणून त्या घटनेचा विस्तार कादंबरीतून मांडण्यास त्यांनी सुरुवात केल्याचे दिसते. रिसबूडांच्या कादंबऱ्यातून मध्यमवर्गीय कुटुंब जीवनाला प्राधान्य दिसते. कारण प्रस्तुतच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतही त्यांनी मध्यमवर्गीय कुटुंबकथाच हाताळली आहे. त्यांच्या आतापर्यंत पाच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यात ' धर्मयुध्द - १९९२ ', ' ब्रह्मकमळ - १९९७ ', ' तृष्णा - २००० ' ' देह जावो अथवा जावो - २००५ ' आणि ' संदर्भासहित स्पष्टीकरण - २००६ '  अशा विविध विषयांवरच्या कादंब-या रिसबूडांनी लिहिल्या आहेत. ' ब्रह्मकमळ ' या कादंबरीतून लेखकाने स्त्रीच्या आत्मसम्मानाचा व व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. या सर्व कादंबऱ्या म्हणजे मराठी साहित्यात एक योगदान देणाऱ्या साहित्यकृती ठरतात. या कादंबऱ्यांचा येथे थोडक्यात विचार करू.

I] **धर्मयुध्द (१९९२)** :-

सुमेध रिसबूड यांची ' धर्मयुध्द ' ही पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी समाजातील भ्रष्ट समाज व्यवस्थेचे वेगळेपण चित्रण केले आहे. ही कादंबरी पूर्णत: संवादात्मक असल्याने तिचे वेगळेपण मानावे लागते. गावातील अनाथालय, साखर कारखाना, हॉस्पिटल, कोर्ट अशा वेगवेगळया ठिकाणांच्या भ्रष्टाचाराविरूध्द एक युध्द पेटले आहे. ते धर्मासाठी पेटले आहे. तो धर्म म्हणजे या ठिकाणी लेखकाला अपेक्षित धर्म हा माणूसकीचा आहे, समानतेचा आहे, प्रेमासाठीचा धर्म आहे. मात्र या युध्दात लढणारे गावातील दोनचारच व्यक्ती आहेत. ग्रामीण जनता मात्र अलिप्त आहे. कारण त्यांना अंग घासण्यासाठी दगड, कालवणासाठी लाल तवंगाची

आमटी आणि मोलमजुरी एवढेच अपेक्षित आहे. येथील अन्याय जागृती, निर्मूलन अशा प्रकारची ध्येय, स्वप्ने घेऊन आलोकसारखा समाजसेवक शहरातून या ठिकाणी येतो व त्यामुळे गावात सुधारणा होण्यास मदत होते. या ठिकाणच्या वातावरणात नायकही मिसळतो आणि धर्म - अधर्माच्या व्याख्याच बदलून जातात. नितिमत्ता ही सोन्यासारखी मानली जाते. म्हणून तिचे मूल्यही स्थळ कालानुरूप बदलते. या बदलत्या नितिमत्तेचा ही कादंबरी शोध घेण्याचा प्रयत्न करते.

वकील, राजकीय व्यक्ती, समाजसेवक, ग्रामीण जनता आणि डॉक्टर इत्यादी विविध प्रकारच्या पात्रांची निर्मिती करून लेखकाने या कादंबरीचा पट साकारला आहे. त्यात माळी व वाटवे हे दोन वकील, तर हणमंतराव देशमाने हा राजकीय पुढारी. आलोक हा या कादंबरीचा नायक आहे. तो समाजसेवक म्हणून गावात प्रसिध्द असतो. तर आदिती ही गावातील अनाथ आश्रमात कार्यकर्ता म्हणून काम करते. या कादंबरीत साकारलेल्या गावाचे नाव ' कडेगाव ' असे असून, त्या गावात भ्रष्टाचार माजलेला आहे. त्या गावात वेगवेगळया समस्या आहेत. या सर्व प्रश्नांना आलोक वाचा फोडण्याचा प्रयत्न करतो. तर हणमंतराव हा गावातील जनतेला नोकरासारखे राबवितो. त्यांची पिळवणूक करतो. याकडे मात्र गावातील कोणाचेच लक्ष जात नाही.

आलोक मात्र संसारंकडे दुर्लक्ष करून झटतो. याचे प्रियंकाला कष्ट सहन करावे लागतात. तसेच या कादंबरीत वर्मा वकील, न्यायाधीश, आदितीचा नवरा कुंदन कोरान्ने इत्यादी पात्रातून ही कादंबरी साकारत जाते. देशमाने सर्व सहकारी संस्थांची सूत्रे आपल्या हाती ठेवतो. व वर्मासारख्या भ्रष्ट वकीलाच्या मदतीने समाजाला लुबाडतो. वर्मा वकील आदिती बरोबर लग्न करण्यासाठी कुंदनच्या मनात तिच्याविषयी द्वेष निर्माण करतो. तरी देखील ती त्याच्याशी लग्न करत नाही. म्हणून तो वेडा होतो.

वाटवे सारख्या चांगल्या नागरिकाची या ठिकाणी हत्या केली जाते. म्हणून आलोक उपोषणाला बसतो. परंतु त्याला देशमाने सहकारी साखर कारखान्यात नोकरी देतो. त्यामुळे नीति -

अनीतिचे सर्व निकषच बदलून जातात. म्हणून या स्वार्थी वृत्तीला कंटाळून त्याची बायको त्याला सोडून पंढरपूरला अनाथ आश्रमात जाण्याचा निर्णय घेते.

कारखाना, केडगावांत दूध डेअरी, तिथल्या गैरव्यवहाराचं गावठाण हायस्कूल, तिथली दोन पिण्याच्या पाण्याची पिंप, केडगाव नळ योजना, गावाच्या सुखावर बिनदिक्कत लाथामारून सरकारीप्रपोजलला ग्रामपंचायतने दिलेला नकार ' सहारा ' अनाथाश्रमातल्य फंडसूची परवड तसेच काही वर्षापूर्वी कोवळया मुलीवर झालेल्या बलात्काराची चौकशी असे अनेक प्रश्न कडेगावात होते. पण आता याकडे कोणचेही लक्ष नाही. म्हणून हे ' धर्मयुध्द ' चालूच राहणार अहे असे समाजातील विविध प्रश्न लेखक या कादंबरीच्या माध्यमातून वाचकासमोर मांडतात.

II) <u>**ब्रह्मकमळ (१९९७)**</u> :-

सुमेध रिसबूड यांची ' ब्रहमकमळ ' ही कादंबरी कोकणातील नैसर्गिक वातावरणात घडणा-या कथानकातून साकार होते. ही कादंबरी स्त्री मनाचे सूक्ष्म भाव चित्रण करते. त्यात वेणू ही तिच्या व्यक्तित्वामुळे मानवी मनाचा ठाव घेते. तर तुलसीच्या रूपाने आधुनिक स्त्रीचे दर्शन घडते. आक्का म्हणजे नशिबी आलेलं भोगावं या वृत्तीची सांसारिक स्त्री, या सूक्ष्म तपशीलांमधून साकारणा-या आणि एका वेगळया वातावरणात नेणाऱ्या रिसबूडांचे लेखन या ठिकाणी वैशिष्टयपूर्ण जीवन दर्शन घडविते. या कादंबरीतील परंपरा कोकणच्या मातीतील आहे. तर पात्रे ही आधुनिक वातावरणात वावरणारी आहेत.

राघव हा जिवंत नसला तरी वेणू, तुलसी आणि आक्का यांच्या स्मृतीत सदैव जिवंत असल्याने तो संपूर्ण कादंबरीत दिवास्वप्नातून वावरत असतो. म्हणून तो या कादंबरीचा नायक ठरतो. त्याचे सुरुवातीचे प्रेम तुलसीवरचे तर नंतरचे वेणूवरचे आहे. तसेच देशपांडे, वेणूची वहिनी, दादा व इतर पात्रांमुळे छोटया - मोठया तपशिलांनी भरलेल्या प्रतिभांमधून कधी प्रगटपणे तर कधी अस्फुटपणे स्त्री पुरुषांच्या प्रेमाची नाती उत्कटपणे वेदनेसह इथे अनेक पाकळयांमधून व्यक्त होतांना दिसतात. हेच या कादंबरीचे वैशिष्टय मानावे लागते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वेणू व आक्का एकत्र जगतात. राघवच्या मृत्यूनंतर अत्यंत उदासीनता यांच्या जीवनात येते. शेजारचे देशपांडे यांच्याशी थोडयाफार प्रमाणात संपर्क ठेऊन आहेत. वेणूला देशपांडेविषयी विशेष आदर असतो. पण आक्काला आवडत नाही. राघवचे तीन वर्षाचे आजारपण घरातील चैतन्य नाहीसे करते. तो गेल्यानंतर वेणूची वहिनी वेणूचा संसार मोडायला येते. आणि आपला हक्क दाखविते. घरातील सर्व जुन्या वस्तू विक्रीला काढते. वेणूच्या शिलाई मशीनची सुई काढून नातवाला खेळावयास देते आणि वडिलांनी दिलेल्या शालीत भांडे गुंडाळते याचे तिला दुःख होते. कारण या दोन्ही वस्तूत वेणूच्या भावनिक मनाची ओढ असते. यात तिच्या बऱ्याच आठवणी गुंतलेल्या असतात.

राघव, वेणू आणि तुलसी एकाच कॉलेजला शिकलेली आहेत. आक्का राघवला तुलसीशी विवाह करण्यास नाकारते म्हणून तो वेणूशी लग्न करतो. हे जेव्हा वेणूला कळते तेव्हा तिला अत्यंत राग येतो. वेणूच्या अत्यंत साध्या स्वभावामुळे संसारात कोणत्याही गोष्टीचा हव्यास नसतो. तुलसीचे व्यक्तिमत्व मात्र उच्चभ्रू संस्कृतीत घडलेले . कारण अनाथाश्रमातून ती निघून जाऊन स्वतःचे भविष्य घडविते. सिगार, दारु व देहभोग या गोष्टी सहज स्वीकारते. गहवारिया या आदिवासी जमातीत राहते. त्यांच्यासाठी समाजसेवा करते. त्यांच्या संस्कृतीत ' जोखोळे ' म्हणजे लग्नपूर्व संबंध हे ' पानफुल ' म्हणजेच ब्रहमकमळ उमलल्यावर येतो. याच ब्रहमकमळामुळे तुलसीचे आयुष्य उदध्वस्त झाले. तर वेणूच्या बाबतीत उलट घडते. तिच्या दारासमोरील कुंडीतील ब्रहमकमळाला कोंब येतो. त्यामुळे चांगल्या घटना घडल्याचा आत्मविश्वास येतो. या ठिकाणचे ' 'ब्रहमकमळ ' दोन वेगवेगळया स्त्रियांचे जीवन, त्यांचे भाव प्रकट करते. ब्रहमकमळ एक आनंदाचे तर दुसरे दुःखाचे प्रतीक आहे.

म्हणून परिस्थितीवर मिळणारा विजय आणि अस्तित्वाची अंतिम घडी हातात हात घालून येऊ शकतात. याची पुन्हा जाणीव वेणूला होते. त्यामुळे पुण्याच्या भावाकडून इस्टेटीची अर्धी मागणी करण्याचे धाडस तिच्यात येते. व हातात असलेले शिलाईमशीन हे एक शस्त्र समजून लढण्यास सज्ज होते.

III) **तृष्णा (२०००)** :-

सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांनी ' तृष्णा ' या कादंबरीत अगदीच वेगळया विषयाला हाताळले आहे. या कादंबरीत समलिंगी संभोगेच्छू पुरुषाच्या मानसिकतेचा वेध घेतला आहे. असा विषय असतांनासुध्दा लेखकाने संपूर्ण कादंबरीत अतिशय संयमाने चित्रण केले आहे. हे विशेष मानावे लागते. या संपूर्ण कादंबरीतील घटना एका चिंतनात्मक पातळीवर विकसित होत जातात. या कादंबरीला अभिजाततेचा स्पर्श होतो.

लेखक या कादंबरीतून समलिंगी पुरुषांच्या मानसिकतेचा प्रभावी शोध घेतात. हा शोध एका प्रौढ बेचाळीस वर्षाच्या यशस्वी पुरुषाच्या मानसिकतेचा आहे. या कादंबरीचा नायक शशिविनय तर ' स्वामी ' हा ' गे ' पुरुषांसाठी एक चळवळ चालविणारा एक ' गे ' च असलेला कार्यकर्ता आहे. ' गे ' म्हणजे समलिंगी संभोगेत्सुक असणारी व्यक्ती. ' गे ' यांच्याविषयी समाजात जागरुकता निर्माण करणारी संस्था स्वामी चालवितो. तसेच ' बॉम्बे फ्रेंड ' नावाचे एक सचित्र मॅगझिनही तो चालवितो. यात म्हाताऱ्यांपासून नवतरुणापर्यंत सर्व पुरुष येतात. म्हणून त्यांच्या मानसिकतेचा लेखक प्रकर्षाने वेध घेतात.

या लोकांच्या आयुष्याच्या शेवटी एक विलक्षण एकटेपणा जाणवतो. त्याच्या दु:खाने व्याकुळ झालेल्याचे चित्रण देखील लेखक ' रोझॉरिओच्या ' रूपाने दर्शवितात. ही कादंबरी एका उदात्त विचारसरणीला जन्म देते. अथवा या उदात्त विचारसरणीला चालना मिळावी आणि वाचक वर्गात समाजात ' गे ' च्या विषयी नवा दृष्टिकोन निर्माण व्हावा या उद्देशाने ही कादंबरी निर्माण झाली आहे.

या कादंबरीविषयी प्रस्तावनेत लिहितांना चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात - " या कादंबरीचा विषय एखादया लोकप्रिय साहित्यिकाच्या हाती पडला असता, तर अश्लील, कामोत्तेजक प्रसंग याची निर्मिती होऊन एक ओंगळ कलाकृती बनणे सहज शक्य होते. सुदैवाने हा विषय आणि समस्या एका चिंतनशील आणि गंभीर प्रवृत्तीच्या अव्वल दर्जाच्या कलावंताच्या हाती पडलेला आहे. जीवनाची समज आणि सौंदर्यमूल्यांची उपजत जाण असणाऱ्या कलावंताने हा विषय

हाताळल्यामुळे सर्व लेखनात दर्जेदार जीवनानुभवाचा तितकयाच समर्थपणे आविष्कार प्राप्त झालेला आहे. जवळ जवळ सर्वच लेखन चिंतनाच्या सूक्ष्म पातळीवर झाल्याने या सर्व लेखनाला अभिजाततेचा दर्जा प्राप्त झालेला आहे "[३१] म्हणून आपणास असे म्हणता येते, की एवढया गंभीर विषयावर एक अत्यंत दर्जेदार अशी कलाकृती निर्माण करण्यात सुमेध रिसबूड यांना यश आले आहे.

IV) **संदर्भासहित स्पष्टीकरण (२००६)** :-

सुमेध रिसबूड या कादंबरीतून महानगरीय जीवनातील कुटुंबव्यवस्थेचे वास्तव चित्रण रेखाटतात. यात लग्न न झालेल्या प्रौढ स्त्रीच्या मानसिक अवस्थेचे चित्रण येते. समाजातील रुढी, परंपरांविरुध्द बंड पुकारणाऱ्या नायिकेची ही करुण कहाणी आहे. ही नायिका सिंधी लोकातील ' लासी ' या कनिष्ठ समाजातील आहे. या समाजात १६ व्या वर्षी लग्न करून दिले जाते. व घरसंसार हेच जीवनाचे सर्वस्व मानणाऱ्या नायिकेच्या समाजातील या रूढीचे ती पालन करत नाही. म्हणून तिचे लग्न होत नाही. त्यामुळे तिला शरीर सुखासाठी परपुरुषांवर अवलंबून राहवे लागते. वयाच्या चाळिशीतही तिची ही अवस्था असल्यामुळे तिला हे जीवन नको वाटते. या आंतरिक मनाच्या घालमेलीचे चित्रण लेखक कादंबरीतून करतो. तिला शिक्षण घेण्याची हौस असल्याने ती मराठीतून बी.ए व एम.ए करते. त्यात तिचे वय वाढते. त्यामुळे तिला या समस्येला सामोरे जावे लागते. तिची लग्नाची इच्छा कधीच पूर्ण होत नाही.

वैभवी आणि दिक्षा या कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. वैभवीसारखीच दिक्षा देखील अविवाहित आहे. परंतु तिला पुरूषांशी संबंध असल्याचे काहीच वाटत नाही. उलट हा जीवनातील ' एन्जॉय ' आहे असे ती मानते. आपल्या भल्या मोठया घरात पेईंग गेस्ट ठेवून त्याच्याशी ती शरीर संबंध ठेवते.

रंजन, स्वाधीन, देशमुख, वैभवीचे वडील दादा, आई-माँ-तिचा भाऊ रविकांत आणि बहिणी-कुशला,पोथी प्रकाशनचे सर्वेसर्वा वैभवजी आणि सुप्रसिध्द चित्रकार एकलव्य इत्यादी पात्रांतून ही कादंबरी विकसीत होत जाते. त्यांचा जीवनपट वाचकांसमोर उभा राहतो. वैभवी ही तिच्या घरातील एक नको असलेली स्त्री, म्हणून तिला एका अडगळीच्या खोलीत रहावे लागते.

आईकडून अत्यंत वाईट वागणूक मिळते, कारण ती लग्न करण्याचे मानत नाही. म्हणून तिला रंजन व स्वाधीनवर शरीरसुखासाठी अवलंबून रहावे लागते.

सौरभजी हे एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व ' पोथी ' प्रकाशनचे मालक, अत्यंत प्रभावी पुरुष परंतु स्वतःच्या बायकोला मात्र ' चूल आणि मूल ' या दोनच गोष्टीत अडकवून ठेवतात. तिला तिच्या ' एम्ब्रॉयडरीच्या फ्रेम ' च्या कामात व शिक्षणात कधीचे पुढे येऊ दिले नाही. सर्व इच्छा-आकांक्षा दाबून ठेवतात. वैभवीशी त्यांचे व्यवहार अत्यंत चांगले. परंतु एकदा ते तिला शरीरसुखाची मागणी करतात. म्हणून ती त्यांच्या थोबाडीत मारते. तिची डायरी लिहिण्याची सवय आणि पुस्तक अनुवाद करण्याच्या सवयीमुळे सौरभजी वैभवीला आत्मचरित्र लिहिण्याचा आग्रह धरतात.

दिक्षा आणि रंजनचे संबंध असले तरी त्यांचे लग्न होत नाही. म्हणून तो कांचनशी लग्न करतो. ही सर्व मंडळी एकाच दु:खाने पीडित असल्याने एकमेकांना समजून घेतात. प्रत्येकाच्या कुटुंबात काहीना काही समस्या आहेत. म्हणून ' एक्सटेन्डेट फॅमिली ' ची कल्पना दिक्षा सुचवते. तिच्या भल्या मोठया घरात या फॅमिलीने एकत्र राहण्याचे ती सांगते. या फॅमिलीतून जे सुख मिळते त्यातून दु:ख विसरून जाण्याची त्यांना अपेक्षा असते. वैभवी व दिक्षा दोघी श्रीमंत कुटुंबातील असतांना सुध्दा खडतर जीवन त्यांच्या वाटयाला येते.

हे सर्व वैभवी आत्मकथेतून लिहिते व प्रकाशित करण्याचा विचार करते. मनाची अस्वस्थता तात्कालिक स्वरूपात का होईना, पण दूरवरचा मार्ग म्हणजे देह संबंध असे वाटत असले तरी ' एक्सटेन्डेट फॅमिली ' मुळे ही ओढ अडगळीत पडेल असे त्यांना वाटते. या सर्व घटनांमधून समस्यांचे निराकरण करण्याचा लेखकाचा हेतू आहे.

**समारोप** :

प्रस्तुत प्रकरणात आपण कादंबरीचा एक वाङ्मयप्रकार म्हणून, तर प्रकरणाच्या पुढील भागात सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा सारांश रूपाने विचार केला.

कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या अभ्यासात कादंबरीचे स्वरूप, तिचे उद्दिष्ट, अनेक अभ्यासकांनी केलेल्या तिच्या व्याख्या, कादंबरीचे घटक, विविध विषयांमुळे झालेले तिचे वर्गीकरण आणि या वाङ्मय प्रकाराचा इतर वाङ्मयांशी असलेला संबंध अर्थात कादंबरीचा इतर वाङ्मयप्रकारांशी तुलनात्मक विचार केला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, कादंबरी हा वाङ्मयप्रकार किती विशाल आणि लोकप्रिय आहे.

व्याख्याच्याबाबातीत विचार केल्यास आपणांस भालचंद्र नेमाडे यांनी केलेली व्याख्या अधिक समर्पक वाटते. तर तिच्या विविध रूपांवरून असे लक्षात येते की, कादंबरी या वाङ्मय प्रकाराने समाजातील प्रत्येक घटकाला स्पर्श केला आहे. त्याचबरोबर कथा, कविता आणि नाटक या वाङ्मयप्रकारांपेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार लेखक आणि वाचक या दोघातही अधिक प्रिय आहे.

तसेच या प्रकरणाच्या पुढील भागात सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा विचार केला. यात त्यांच्या सहा कथासंग्रहांचा आणि चार कादंबऱ्यांचा सारांश रूपाने अभ्यास केला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, त्यांचे एकूण लिखाण महानगरीय जीवनांशी अधिक जवळचे आहे. तसेच त्यांच्या लिखाणातून स्त्रियांच्या विविध रूपांचे, अंतर्मनाचे दर्शन होते. समाजातील संस्कृती, विकृती, प्रवृत्तीवर देखील रिसबूडांनी आपले लिखाण केले आहे. त्यांच्या कथा या दीर्घकथा आहेत. एखादी लघुकादंबरीच वाटावी एवढया दीर्घत्वाकडे झुकलेल्या आहेत.

महानगरातील मध्यमवर्गीय जीवन, चाळ संस्कृती, दारिद्रय, श्रीमंत उच्चभ्रू लोकांचे जीवन, जगण्यातील धडपडी इ. विषयांवर काही लिखाण केले आहे. तसेच ग्रामीण जीवनाचे चित्रण देखील त्यांनी आपल्या साहित्यातून रेखाटलेले आहे. त्यांच्या ' तृष्णा ' या कादंबरीतून अतिशय गंभीर विषयाचे चित्रण आले आहे. जे मराठी साहित्यात कोणत्याही साहित्यिकाने केलेले दिसत नाही. कादंबरी यातून लेखकाने ' समलैंगिक ' विषयावर चिंतनशीलतेने प्रकाश टाकला आहे. यात ' 'समलैंगिक ' लोकांच्या मानसिकतेचा, अंतर्मनाचा शोध घेतला आहे.

अशाप्रकारे आपण या प्रकारणातून कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या विविध वैशिष्टयांबरोबरच सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा अभ्यास केला आहे. त्यावरून रिसबूडांच्या लेखनाची वर नमूद केलेली वैशिष्टये आपल्या लक्षात येतात. आता पुढील प्रकरणात सुमेध वडावाला रिसबूड यांच्या ' देह जावो अथवा जावो ' कादंबरीतील आशयसूत्रांचा विचार करू.

# संदर्भ ग्रंथ


| अ.क्र. | ग्रंथकार | ग्रंथनाम |
| --- | --- | --- |
| १. | बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा. | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास,<br>व्हिनस प्रकाशन, पुणे.<br>तिसरी आवृत्ती - १९७३ ( पान २) |
| २. | संपा. भागवत श्री.पु. आणि इतर | प्रा.वा.ल.कुलकर्णी गौरव ग्रंथ,<br>साहित्य अध्यापन आणि प्रकार,<br>मौज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई<br>पहिली आवृत्ती - ५ एप्रिल,१९८७ (पान २७३ ) |
| ३. | देशपांडे कुसुमावती | मराठी कादंबरी - पहिले शतक, (१८५० ते १९५०)<br>मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई.<br>पहिली आवृत्ती, जुलै-१९५३ |
| ४. | नेमाडे भालचंद्र | टीकास्वयंवर,<br>साकेत प्रकाशन, औरंगाबाद.<br>पहिली आवृत्ती - सप्टेंबर,१९९० (पृ.१८८) |
| ५. | तत्रैव | (पृ.२०१ ) |
| ६. | बांदिवडेकर चंद्रकांत | मराठी कादंबरीचा इतिहास - ( १९२० - १९४७ )<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>द्वितीय आवृत्ती - ऑक्टोबर,१९९६ ( पृ.४ ) |
| ७. | संपा. भागवत श्री.पु. आणि इतर | प्रा.वा.ल.कुलकर्णी गौरव ग्रंथ,<br>पूर्वोक्त (पान २६७ ) |
| ८. | बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा. | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास,<br>पूर्वोक्त( पृ.३६ ) |
| ९. | तत्रैव | (पृ.३७ ) |
| १०. | नेमाडे भालचंद्र | टीकास्वयंवर,<br>पूर्वोक्त |
| ११. | संपा.गणोरकर प्रभा आणि इतर | वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,<br>जी.आर.भटकळ फाऊंडेशन, मुंबई.<br>प्रथम आवृत्ती - डिसेंबर,२००१ |

| | | |
|---|---|---|
| १२. | संपा.जोशी लक्ष्मणशास्त्री | मराठी विश्वकोश खंड - ३,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.<br>सन - १९७६, ( पृ.६०० ) |
| १३. | संपा. भागवत श्री.पु. आणि इतर | प्रा.वा.ल.कुलकर्णी गौरव ग्रंथ,<br>पूर्वोक्त (पान २६७ ) |
| १४. | मराठे का.बा. | नावल व नाटक ह्याविषयी निबंध,<br>मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे.<br>सन - १९६२ (१) |
| १५. | कुलकर्णी श्री.मा. | कादंबरीची रचना,<br>उन्मेष प्रकाशन, नागपूर<br>प्रथम आवृत्ती - १९५६ ( पृ.१७ ) |
| १६. | तत्रैव | (पृ.१५ ) |
| १७. | संपा.गणारेकर प्रभा आणि इतर | वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,<br>पूर्वोक्त |
| १८. | बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा. | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास,<br>पूर्वोक्त ( पृ.८८ ) |
| १९. | कुलकर्णी श्री.मा. | कादंबरीची रचना,<br>पूर्वोक्त ( पृ.४३ ) |
| २०. | संपा.गणोरकर प्रभा आणि इतर | वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,<br>पूर्वोक्त( पृ.१७६ ) |
| २१. | बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा. | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास,<br>पूर्वोक्त ( पृ.१३० ) |
| २२. | कुलकर्णी श्री.मा. | कादंबरीची रचना,<br>पूर्वोक्त ( पृ.१०५ ) |
| २३. | तत्रैव | (पृ.११३ ) |
| २४. | संपा.गणोरकर प्रभा आणि इतर | वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,<br>पूर्वोक्त |
| २५. | देशपांडे बालशंकर | कादंबरी विवेचन आणि विश्लेषण,<br>स्नेहवर्धन पब्लिशिगं हाऊस, पुणे.<br>पहिली आवृत्ती - १ ऑक्टोंबर,१९९८ ( पृ.६२ ) |

| | | |
|---|---|---|
| | | |
| २६. | संपा.गणोरकर प्रभा आणि इतर | वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,<br>पूर्वोक्त ( पृ.१८७ ) |
| २७. | यादव आनंद | १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>प्रथम आवृत्ती ( पृ.३६ ) |
| २८. | संपा.गणोरकर प्रभा | संक्षिप्त मराठी वाङ्मय कोष १९२० ते २००३ पर्यंतचा कालखंड,<br>प्रकाशक जी.आर.भटकळ फॉऊंडेशन, मुंबई.<br>आवृत्ती - फेब्रुवारी,२००४ ( पृ.७४२ व ७४३ ) |
| २९. | रिसबूड सुमेध वडावाला | सांजवा,<br>प्रकाशक - मेहता पब्लिशिगं हाऊस, पुणे.<br>आवृत्ती प्रथम,१९९३ ( पृ.९० ) |
| ३०. | रिसबूड सुमेध वडावाला | अंत गोकुळाचा,<br>प्रकाशक - ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे.<br>आवृत्ती - प्रथम जानेवारी,१९९९ ( पृ.१४९ ) |
| ३१. | रिसबूड सुमेध वडावाला | तृष्णा,<br>प्रकाशक - डिंपल पब्लिकेशन्स, मुंबई.<br>आवृत्ती - प्रथम,२०००<br>( प्रस्तावनेतून ) डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर |